साल अखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास .................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........०१ ०६
दुसरे खेपेस ........... ०१

Six monthly......... 5 ......... 5 a
Single copy ................ ....... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 4 JANJARY 1897 | NO I
वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख ४ माहे जानेवारी सन १८९७ इ० | अंक १

### नोटीस

सर्वांस कळावें कीं वऱ्हाडांतील शेतकरी व रहिवासी लोक त्यांचे जनावरांस तारीख १५ मार्च सन १८९७ पासून जून सन १८९७ अखेर पर्यंत मेळघाटांतील बंदी जंगलांत पाण्याचे जवळपास मुफत चारणाची परवानगी मिळेल. मात्र त्या लोकांनीं तारीख १५ फेब्रुवारी सन १८९७ चे पूर्वी मेहेरबान डेपुटी कानसरव्हेटर आफ फारस्ट मुकाम चिखलडा यांचे कडेस ह्या संबंधानें अर्ज पाठवावा. त्या लोकांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं मेळघाटांत पाठविलेल्या जनावराबद्दल सरकार कोणत्याही प्रकारें जबाबदार होणार नाहीं परंतु त्यांची इच्छा असल्यास मेहेरबान डेपुटी कानसरव्हेटर आफ फारेस्ट यांचे मार्फत मेळघाटांतील गवळी व कुर्कु लोकांस प्रत्येक जनावराबद्दल दरमहा माफक पैसे देऊन त्याचे कडून जनावरांस राखण्याची वगैरे सोय केली जाईल. कळावें ता० २९ माहे डिसेंबर १८९६ इ०

(सही)

सेसिल ब्यागशॉ कानसरव्हेटर आफ फारेस्ट वऱ्हाड

### जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

### नोटीस

चिरंजीव राजश्री यशवंत वल्लद परशराम राहणार मौजे वारुळें तालुके अकोट—यांस.

मोठ्या दुःखाची गोष्ट कीं तूं लबाड व फैली लोकांच्या नादीं लागला आहेस तुझेंच कल्याण तुला समजत नाहीं. तूं माझ्या आज्ञेबाहेर वागतोस आणि वाटेल त्या भलत्या सलत्या गोष्टी देखिल करतोस. मी तुला माझ्या दृष्टीसमोर उभा राहूं देत नाहीं. तरी देखील तुला त्याची खंती वाटत नाहीं. तूं लहान आहेस. तूं रोजगार धंदा शिकावा आणि चांगला शहाजेंगपणानें प्रपंच करावास ह्मणून मी तुला वारंवार सांगत आहे. लवकर शुद्धीवर ये आणि नीट मार्गाला लाग. माझ्या इच्छेबाहेर चालशील तर मी तुला बे वारस करून सोडीन आणि तुझे हाल तूच शोधून पहा. घरचा कर्ता पुरुष मी आहें तरी देखील तूं मूर्खपणानें भलतेंच व्यवहार व देवघेवी करितोस असें ऐकतों. मी तुला एक कवडी देखील देणार नाहीं. तुझ्या मूर्खपणाचा मामला तुलाच निसतरावा लागेल आणि त्याबद्दल स्थावर जंगम इस्टेटीवर कोणत्याही प्रकारची जबाबदारी नाहीं. ह्मणजे तुझ्याशीं जो व्यवहार ठेवील तोच परिणामीं फसेल. कळावें हा आशीर्वाद. तारीख २८।१२।९६ इसवी.

(सहीची निशाणी)

परशराम वल्लद भगवान पाटील राहणार मौजे वारुळें.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस या लेखान्वयें खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, माझा मुलगा नांमें यशवंता हा हल्लीं लबाड लोकांच्या संगतींत असतो ह्मणून तो शुद्धीवर येऊन माझ्या आज्ञेंत वागूं लागेपर्यंत मी त्याला काढून देऊन कोणतीही देवघेव किंवा व्यवहार न करण्याविषयीं सक्त मनाई केली आहे. जर कोणी त्याच्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार किंवा देवघेव करील तर त्याचा तो जबाबदार राहील, आणि त्यासंबंधानें स्थावर जंगम इस्टेटीला कोणत्याही रीतीनें तोशीस लागणार नाहीं. गहाण, विक्री, खरेदी, कर्जाची देवघेव किंवा कसलाही नफा नुकसानीचा व्यवहार कोणी यशवंताशीं करूं नये ह्मणून ही जाहीरखबर दिली आहे. कळावें. तारीख २८।१२।९६ इसवी.

(सहीची निशाणी)

परशराम वल्लद भगवानजी पाटील राहणार मौजे वारुळें तालुके आकोला

वऱ्हाड समाचार

मिती पौष शुद्ध १ शके १८१८

## राष्ट्रीय सभा.

(कलकत्याचा १२ वा वार्षिक समारंभ)

गेल्या सोमवारीं तारीख २८ दिसंबर रोजीं राष्ट्रीय सभेच्या कामाला सुरुवात झाली. प्रतिनिधी आणि प्रेक्षक यांची गर्दी पुष्कळ झाली होती. सुमारें ७०० वर मुखत्यार होते. सर्व थाटमाट अगदीं राजेशाई दरबाराचा होता. प्रारंभीं स्वागत कमिटीचे अध्यक्ष सर रोमशचंद्र मित्र यच्यानें सभेला येववलें नाहीं ह्मणून त्यांच्या बद्दल डाक्टर राश बिहारी घोस यांनीं समारंभार्थ आलेल्या पाहुण्यांचें स्वागत सर मेशचंद्र यांच्याच लिखित शद्बांनीं केलें. पंडित विश्वंभर नाथ आणि नामदार आनंदाचार्लू यांच्या सूचने प्रमाणें नामदार आर. एम. सयानी यानीं अध्यक्षस्थान स्वीकारलें आणि प्रारंभीं त्यांचें संभाषण झालें त्यांच्या संभाषणांत राष्ट्रीय सभेच्या गत वृतांताचें तात्पर्य चांगलें व्यक्त केलें आहे आणि त्या शिवाय राष्ट्रीय सभेला मुसलमान लोकांची अनुकूलता किंवा प्रतिकूलता असावी अशा विषयीं चांगला बोध केलेला आहे. सर्व संभाषणाचा लेख फार विस्तृत आहे तथापि त्या इंग्रजी लेखाची संक्षिप्त हकीकत मराठींत आह्मी आपल्या वाचकासाठीं खालीं देत आहों:-

सर्व राष्ट्रानें दिलेल्या अध्यक्षस्थानाच्या उत्तमोत्तम बहुमाना बद्दल मी आपले मनोभावानें आभार मानतों. राष्ट्रीय सभा ह्मणजे सर्व राजनिष्ठेच्या व देशाभिमानाच्या, तसेंच उन्नतिप्रद व वजनदार, आणि सुधारलेल्या व लोककल्याणकारी गोष्टींची सारभूत संस्था होय. तिच्या मागील अध्यक्षांच्या मानानें मी सामान्य मनुष्य आहे तथापि आपल्या सर्वांच्या प्रेमळ व उदार साह्यानें ईश्वरकृपेनें मी आपलें कर्तव्य आपल्या मने दया प्रमाणें बजावीन असें वाटतें.

### राष्ट्रीय सभेची उत्पत्ती

सन १८८५ मध्यें राष्ट्रीय सभा भरविण्याचा प्रथम विचार निघाला. पाश्चात्य विद्या शिकलेल्या व पाश्चात्य राज्यसंस्था चाहणांच्या पुढारी लोकांनीं प्रांतोप्रांतींच्या मुख्य मुख्य लोकांस निमंत्रण केलें आणि आपल्या देशांतील दुःखें घालविण्या साठीं, आपल्या लोकांचा राजकीय हीनपणा दूर करण्यासाठीं, व सांप्रतच्या प्रगतीला अनुरूप अशा सुधारणा करण्यासाठीं सरकाराशीं दाद मागावी असा सर्वानुमतें संकल्प ठरला, ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदार राजनीतीच्या अनुसंधानानें ही दाद मागण्यांत येत आहे. ही राजनीती ब्रिटिश कायदे, हक्कलेख, राणी सरकारचा जाहिरनामा आणि पार्लमेंटचे ठराव यांच्यामध्यें संग्रहित केलेली आहे. सर्व राष्ट्राचा या प्रकरणीं एक विचार निश्चयपूर्वक झाला आहे. ब्रिटिश नवीनें राजधर्माच्या शिक्षणामुळें राजकीय पायमल्ली लोकांच्या उन्नत व विशाल बुद्धिवैभवाला सहन होईना, लोकांच्या संस्कृत कल्पना राजकीय पंगुपणा पाहून फार क्षुब्ध झाल्या आणि त्यांच्या मनानें उत्तम कोटीच्या उन्नतावस्थेकडे धांव घेतली. अर्थात् निराळीच राजकीय उन्नतीची प्रेरणा लोकांच्या मनांत ऊठूं लागली आणि स्वदेशाच्या राज्यकारभारात आपला हात शिरावा, व राजकीय स्वतंत्रता मिळावी ह्मणून सर्वत्र लोक उत्क्रांतीदर्शक चळवळी करूं लागले. राष्ट्रीय सभा ह्मणजे सर्व हिंदुस्थान देशाची एकवटलेली संस्था आहे. पौर्वात्य विचार व पाश्चात्य विचार यांच्या संघट्टणानें सर्व लोक एक राष्ट्रीय बनत चालले आहेत. हा एक राष्ट्रीयपणा इंडियाचें कल्याण व इंग्लंडाचें वैभव यांचें द्योतक चिन्ह होय; आणि राष्ट्रीय सभेची संस्थापना ज्या महात्म्यांनीं केली त्यांची किर्ती दिगंत वृद्धि पावत आहे.

राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांच्या विधानांची संक्षिप्त मीमांसा:-

(अ) इंडिया ही आपली आर्यमाता होय आणि तिची आपण सर्व मुलें आहोंत तेव्हां परस्परांशी बंधुत्वाच्या नात्यानें वागावें.

(ब) इंडियांतील मोठमोठ्या वेगवेगळ्या समाजांत सख्यभाव आणि मैत्री वाढविणें, राष्ट्रीयत्वाची ऐक्यवृध्दी करणें, आणि नानाविध जातींचें व पंथाचें संमेलन करून आकर्षकशक्तीनें एकराष्ट्र बनविणें आपलें कर्तव्य आहे.

(क) मुख्यत्वें करून इंडियाच्या वतीनें परिश्रम घेणाऱ्या राष्ट्रभक्तांची मैत्री वाढवावी ह्मणजे जातीचे व स्थलभेदाचे दो-

ष नाहींतसे होऊन आपल्या लोकांचा एक अभेद्य दुर्ग होईल आणि नंतर बाह्य भेदाभेदाचा व फाटाफुटीचा मारा कांहीं चालणार नाहीं.

( ड ) आपल्या देशाचें कल्याण साधण्याच्या दृढ संकल्पानें आपण सर्व देशाची उन्नती होईल अशी कार्यमाला योजिली पाहिजे.

( इ ) प्रत्येक प्रश्न अशा रीतीनें विचारांत घ्यावा कीं पक्षेपणी पूर्वी त्याचें समालोचन केल्या नंतर आणि क्रमवार भवति न भवति झाल्या नंतर त्या विषयीं सर्व सुशिक्षित राष्ट्रवाल्यांचें एकमत स्थापित होईल.

( एफ ) सर्व राष्ट्राचा ज्यांत संबंध अशा विषयाकडे आपण लक्ष्य धावें आणि विचारी व दूरदर्शी लोकांच्या अनुभवानें निर्णीत असे आपले ठराव असावेत. परस्परांच्या मताविषयीं व मनोवृत्ती विषयीं आदरबुद्धी कायम ठेवावी आणि ब्रिटिश इंडियांतील विद्वान व विचारशील लोकांच्या एक विचारानें आपले विषय ठरविलेले असावेत.

( जी ) आपल्या कार्यपद्धतींत मर्यादितपणा व भारदस्तपणा असावा ह्मणजे विरोधी टिकेला स्थळ मिळणार नाहीं. प्रत्येक सभासदानें सर्व बाजूंनीं कोणत्याही विषयाचा विचार करावा आणि राष्ट्रीय सभेचा ठराव ह्मणजे वेदवाक्या प्रमाणें सर्ववंद्य असावा. आपल्या भाषणांत नेमस्तपणा ठेवून मागणीही बेताबाताची असावी. संयपणा, दृढनिश्चय आणि भगीरथ प्रयत्न हींच यशाची खरीं साधनें आहेत.

( एच ) परिणामीं न्याय व सत्य यांचा च विजय होतो या महातत्वावर पूर्ण भरंवसा ठेऊन राष्ट्राचें पुनरुज्जीवन करावें आणि अविचारानें कोणतेंही कृत्य करण्याचें धाडस करूं नये.

( आय ) शांतता, राजनिष्ठा आणि सुधारणा हींच आपलीं इष्ट कार्यें होत आणि यांतच आपलें कल्याण आहे.

( जे ) सरकारापाशीं आपलीं गाऱ्हाणीं सांगणें, राजकीय गोष्टींत आपण किती हीन आहों हें दाखविणें आणि आपल्या भावी आशा विदित करणें हें आपलें कर्तव्य होय.

या नंतर अध्यक्षांनीं राष्ट्रीय सभेचे आजन पर्यंतच्या ठरावाचे विषय, सभेचीं स्थळें आणि सभेचे माजी अध्यक्ष ही सांगून कळविलें कीं पाश्चात्य विद्येच्या संस्कारानें व युरोपाच्या इतिहासापासून कळलेल्या राजनीतीनें सुशिक्षित झालेल्या एतद्देशीयांस आपआपल्या देशाची राजकीय उन्नती करण्याविषयीं स्फूरण आलें आणि मिथ्यारोप व गैरसमज यांस न जुमानतां दूरदर्शिपणानें व काळजी पूर्वक त्यांनीं राष्ट्रीय सभेस सध्याचें स्वरूप आणून दिलें आहे. राष्ट्रीय सभा सर्वांची आहे हें तिचे जे हिंदु, मुसलमान पार्शी, व आंग्लोइंडियन अध्यक्ष होते त्यावरून दिसून येते.

## इंग्लंडची राजनीती

राष्ट्रीय सभेची कार्यपत्रिका इंग्लंडाच्या राजनीतीच्या धोरणावरच झालेली आहे. ही राजनीति गेल्या सुमारें १०० वर्षांत निरनिराळ्या मुत्सद्यांनीं आपापल्या लेखांनीं निश्चित केली आहे. सन १७८७पासून सन १८८७ पर्यंत मोठमोठ्या धुरंधर मुत्सद्यांनीं ह्मणजे सर जान शोअर, चार्लिस ग्रांट, हेस्टिंग्स, एलफिनस्टन, मालकम; कोर्ट आफ डायरेक्टर्स, ग्लाडस्टन, नार्थब्रुक, लिटन, रिपन व लार्ड डफरीन इत्यादिकांनीं प्रणीत केलेली राजनीति सांगून नामदार अध्यक्ष साहेबांनीं त्यांतील निवडक तत्वें येणें प्रमाणें गोविलीं आहेतः—

(अ) इंडियाच्या लोकांचें हित, सुख, व कल्याण याजकडे अधिक लक्ष्य पोंचविणें हें इंग्लंडचें कर्तव्य होय.

(ब) इंडियावर इंग्लंडचें प्रभुत्व राहावें ह्मणून इंडियांतील लोकांस अज्ञानावस्थेंत ठेवणें इष्ट नाहीं.

(क) इंडियन लोकांस विद्यामृत पाजावें. इंग्रजी भाषें मधून विद्या शिकवाव्या, आणि पाश्चात्य कल्पना त्यांच्यामध्यें चांगल्या प्रसृत कराव्या.

( ड ) देशाच्या-राज्यकारभारांत राज्यकर्त्यांबरोबर काम करण्यास इंडियन लोकांस मोकळीक असावी आणि वास्तविक महत्वाकांक्षेस सुसाध्य व उच्च पदवीस अनुरूप अशा राजमान्य जागा इंडियनांस मिळण्यास आडकाठी असूं नये.

( इ ) कोणतीही सरकारी जागा मिळण्यास इंडियनांस प्रत्यवाय असूं नये.

( एफ ) इंडियांतील राज्यकर्त्यांची राजनीति न्यायाची, सद्भावाची व शुद्धाचरणाची असून लोककल्याणकारी असावी.

## महाराणी सरकारचा जाहिरनामा.

१८५८ सालचा जाहिरनामा ही इंडियन लोकांची मोठी सनद आहे. त्यामध्यें राणीसरकारांनीं सर्व प्रजाजनांस सारखें वागवूं आणि जात व धर्म यांचा भेद न पाळतां निःपक्षपातानें त्यांच्या नेमणूका करूं असें अभिवचन दिलें आहे. ही सनद ह्मणजे राज्यकारभारांतील मुख्य तत्वांचा जाहिरनामाच आहे. बंड मोडल्या नंतर महाराणी साहेबांनीं ईश्वरावर भरंवसा ठेवून मोठ्या दयार्द्र बुद्धीनें व स्वसंतोषानें ही सनद दिली आहे. लवकरच संपणाऱ्या चालू शतकांत भूतदयेची प्रेरणा अत्यंत सुखावह होऊन पूर्वीचा अन्याय व मूर्खपणा भूपृष्ठावरून नाहींसा झाला. या भूतदयेच्या शतकामध्यें हा जाहिरनामा प्रकाशित झाला ही गोष्ट मोठ्या महत्वाची आहे आणि कृतज्ञ इंडियन लोक हा महदुपकार चिरकाल स्मरतील.

वरील विवेचना वरून हें स्पष्ट आहे कीं जे इंग्लिश लोक स्वकीय राजनीतीला फार चाहतात आणि स्वतांची स्वतंत्रता कायम राखण्या विषयीं अव्याहत प्रयत्न करीतात ते लोक इंग्लिश विद्येनें व राजनीतीनें सुसंस्कृत झालेल्या इंडियनांचे मनोरथ विफल करणार नाहींत. कांहीं युरोपियनांच्या तिरसट व कडक स्वभावा वरून व इतर बाह्य क्षुद्र गोष्टीवरून इंग्लिश लोक इंडियना विरुद्ध आहेत असा कित्येकांचा ग्रह आहे तो भ्रांतिमूलक होय.

राष्ट्रीय सभेला मुसलमानां मध्यें कांहीं लोक प्रतिकूल आहेत हें चुकीचें आहे असें दाखविण्या साठीं अध्यक्षांनीं फार नामी मुद्देसूत विचार निर्दिष्ट केला आहे. त्या मध्यें मुसलमानांचे १७ आक्षेप नमूद करून त्यांचें सप्रमाण खंडण केलें आहे. पण हा भाषणाचा भाग सविस्तर असल्या मुळें स्थलसंकोचास्तव तो आम्ही सध्यां देत नाहीं. राष्ट्रभक्त मनमोहन घोस आणि राव बहादूर ध्रुव यांच्या मरणाबद्दल दुःख प्रदर्शित करून अध्यक्ष हिंदुस्थानच्या सद्यस्थितीकडे वळले.

( पुढें चालेल )

मंगळवारच्या ह्मणजे दुसरे दिवशींच्या बैठकीस जे ठराव झाले ते येणें प्रमाणें आहेतः-

[ १ ] महाराणी सरकारास सिंहासनारूढ होऊन ६० वें वर्ष लागलें ह्मणून महाराणी साहेबांचें आल्हादपूर्वक अभिनंदन करण्या विषयीं ठराव झाला तेव्हां सर्व सभा उभी राहिली आणि त्रिवार जयघोष करण्यांत आला.

[ २ ] मुलकी खात्या पासून न्यायखातें वेगळें करावें.

( ३ ) प्रांतिक सरकारापासून कांहीं ठरीव व योग्य रक्कम इंम्पिरिअल (राष्ट्रीय) सरकारानें दर साल घ्यावी आणि प्रांतिक सरकारच्या जमा खर्चाच्या कामांत वरिष्ठ सरकारानें हात घालूं नये. प्रांतिक सरकाराला राज्यकारभारासाठीं वारंवार रक्कम ठरवून देण्याची हल्लींची पद्धत वाईट आहे.

( ४ ) इंग्लंडांतल्या प्रमाणें इंडियांत समकालीन सिव्हिल सरव्हिस परीक्षा घेण्यांत यावी.

[५] स्टेट सेक्रेटरीनें जो विद्याखात्यांतील नेमणूकांचा नवा ठराव केला आहे त्यामध्यें वरिष्ठ प्रतीच्या नेमणूका नेटिवांस मिळूं नयेत अशी योजना केली आहे. या गोष्टी विषयीं राष्ट्रीय सभा सरकारास फार दोष देते.

( ६ ) सर वुलियम वेडरबर्न व मि. केन साहेब आणि ब्रिटिश कांग्रेस कमिटी यांनीं केलेल्या उपकारा बद्दल राष्ट्रीय सभा अती कृतज्ञ आहे.

( ७ ) दाक्षिण आफ्रिकेंत नेटिवांच्या हक्कांची पायमल्ली झाली आहे आणि त्या भागांत युरोपियन लोक नेटिवांचा फार छळ करितात तर सरकारानें या बद्दल लवकर दाद घ्यावी.

[ ८ ] इंडियांतील वैद्यक खात्यांतील नेमणूकावर नेटिवांस नेमण्याविषयीं सरकारास सूचना करावी.

बुधवारच्या बैठकीच्या वेळीं ज्या विषयांची चर्चा झाली त्यामध्यें असे ठराव झाले कीं ( १ ) सन १८९० च्या मार्च महिन्यांत प्रसिद्ध केलेला अबकारी विषयींचा ठराव अमलांत आणण्या साठीं सरकारास विनंती करावी; ( २ ) सहा महिन्यापेक्षां अधिक शिक्षेच्या अपराधाची चौकशी सेशन कोर्टांत चालावी असें मागण्याचा हक्क अपराध्यास असावा; ( ३ ) हत्याराचा कायदा सुधरला पाहिजे तो असा कीं जेथें जेथें हिंस्र पशूंच्या तडाख्यांत सांपडून माणसें व जनावरें नेहमीं मरतात व पिकांचा नाश होतो त्या भागीं हत्याराचे परवाने मिळविण्याच्या नवीन सवलती देण्यांत याव्या ( ४ ) लष्करी कालेजाची स्थापना इंडियांत झाली पाहिजे; (५) नेटिवांस व्हालंटीअर पलटण बनविण्याची परवानगी मिळावी; [ ६ ] काम्पेनसेशन आलावन्स बंद करावा; ( ७ ) स्टेट-सेक्रेटरीचें कौंसिल बंद करण्यांत यावें आणि ( ८ ) पंजाबासाठीं हायकोर्ट व प्रांतिक कायदे कौंसिल असावें

नामदार सुरेंद्रनाथ बानरजी यांनीं दुष्काळा संबंधानें असा ठराव सभपुढें आणिला कीं:- सर्व हिंदुस्थानभर कमी ज्यास्त प्रमाणानें दुष्काळ पडला आहे ही मोठी दुःखाची गोष्ट होय; आणि हा दुष्काळ व अलिकडेस येऊन गेलेले दुष्काळ यांचीं कारणें शोधलीं तर प्रथम कारण प्रजेचें अठरा विश्वे दारिद्र्य होय; देशांतील संपत्तीचे प्रवाह वर्षानुवर्षे बाह्य राष्ट्रीं ह्मणाऱ्यानें वहात चालले आहेत त्यामुळें दारिद्र्यानें आपल्या देशास चोहोंकडून घेरलें आहे. करांचा बोजा अती वाढला व साऱ्याची वाढ अमर्याद होऊन गेली हें दुष्काळाचें दुसरें कारण होय. सरकारच्या राज्यकारभाराची उधळपट्टीची रिती सिव्हिल खात्यांतून धडाक्यानें चालू आहे आणि त्यामुळें लोकांची दशा इतकी भिकार होऊन गेली आहे कीं दुष्काळाचा प्रादुर्भाव होतांच लोक नादान व हताश झाले आणि सरकाराच्या व खानगी अन्नदात्यांनीं त्यांचे प्राण वांचविले नाहींत तर ते खात्रीनें मृत्यूच्या जबड्यांत पडतील. दुष्काळाची पुनरावृत्ती होऊं नये ह्मणून राष्ट्रीय सभा हा उपाय सूचविते कीं काटकसरीचा राज्यकारभार असावा, देशांतील संपत्ति देशांतच सांठू द्यावी, लयास जात चाललेल्या देशी कलास व धंद्यास पुनरुज्जीवन मिळावें, व सांप्रतच्या नवीन कला व उद्योग ह्या देशांत प्रस्तुत व्हावे. राष्ट्रीय सभा सरकारला तूर्त स्मरण देतें कीं, प्रजेचा प्राण वाचविला पाहिजे व त्यांचे हाल कमी केले पाहिजेत; चालू असलेल्या दुष्काळाच्या कायद्यांत रोजमुरा व पोटगी भत्ता यासंबंधानें फार उणिवी आहेत, आणि खडी फोडण्यासारखें काम चोपून घेण्याची रीति फार घातुक आहे. तसेंच राष्ट्रीय सभेची सरकारास विज्ञप्ति आहे कीं, दुष्काळ निवारण फंडाविषयीं दिलेलीं वचनें खरीं करून दाखवावीं, दुष्काल-फंड स्वतंत्र वेगळा राखावा आणि त्याचा उपयोग दुष्काळानें पीडलेल्या लोकांच्या संरक्षणाकडे करण्यांत यावा. या अशा भयंकर प्रसंगीं इंग्लंडांतील धर्मात्मे वर्गण्या पाठविण्यास तयार आहेत आणि खानगी धर्मादायानेंच दुष्काळानें पीडिलेल्या पुष्कळ लोकांस मदत मिळत असते या गोष्टी लक्ष्यांत घेतल्या ह्मणजे राष्ट्रीय सभेस मोठ्या आवेशानें इंडिया सरकारच्या विरुद्ध मतप्रदर्शन करावें लागतें कीं इंडिया सरकारनें विलायतेंत वर्गण्या सध्यां न जमूं देण्याविषयीं जी व्यवस्था केली ती अगदीं चुकीची केली आणि लॉर्ड लिटन साहेबांनीं जी असली घातुक चूक पूर्वी करून ठेविली ती पुन्हा होणार नाहीं अशी राष्ट्रीय सभेस बळकट आशा आहे.

या मोठ्या पण अती उपयुक्त ठरावविषयीं सूचना केली त्यावेळीं नामदार सुरेंद्रनाथ यांनीं सांगितलें कीं राष्ट्रीय सभेचा सल्ला सरकारनें ऐकिला असतां तर दुष्काळाचें नांव घेण्याची जरूरी नव्हती. हल्लीं दुष्काळ नाहीं किंवा फार कमी आहे ह्मणून दाखविण्याची जी पद्धत व्हा[illegible]य साहेबांनीं उच-

ली आहे ती फार वाईट होय. वायव्य प्रांतांत सर आनटोनी म्यागडोनल यांनीं दुष्काळा विषयीं ज्या योजना केल्या आहेत त्या खरोखर राजमान्य आहेत. अखबर बादशहाच्या वेळीं लोकांस रोजी थोडी मिळे पण अन्नाची स्वस्ताई अती होती आणि हल्लीं रोजी मोठी मिळूनही लोकांची दशा मुसलमानी किंवा मराठी राज्यापेक्षां इंग्लिश राज्या खालींच अगदीं वाईट झाली आहे.

स्टेट सेक्रटरी व लार्ड मेअर यांस तारा पाठवून विलायतेंत सभा भरवून दुष्काळा निमित्त वर्गण्या गोळा करण्यास प्रारंभ करण्या विषयीं विनंती करण्याचा ठराव सर्वानुमतें पसार झाला.

---

गुरुवारच्या बैठकीच्या वेळीं जे ठराव झाले त्यांचा मतबल असा कीं:—

( १ ) गरीब लोकांची स्थिती शोचनीय आहे आणि ती सुधारण्या साठीं सरकारानें कायमची दर-ठरोती केली पाहिजे, शेतकऱ्यासाठीं पेढ्या काढल्या पाहिजेत, इनकम ट्याक्सा पासून हल्लीं वार्षिक उत्पन्न ५०० रुपये माफ आहे तर १००० रुपये पर्यंतचें उत्पन्न माफींत काढावें आणि धंदे-शिक्षणाच्या शाळा स्थापाव्या व देशी धंद्यास उत्तेजन द्यावें.

( २ ) झालवारच्या महाराजांस पदच्युत करिते वेळीं घडलेला अन्याय पुन्हा होऊं नये ह्मणून सरकारानें असा कायदा करावा कीं देशी संस्थानिकांस व राजे राजेवाड्यांस पदच्युत करण्या पूर्वीं त्यांची वाईट राज्यव्यवस्था किंवा वाईट वागणूक ही एखाद्या लोकमान्य न्यायासना समोर पूर्ण पणें शाबीत झाली पाहिजे ह्मणजे लोकांत वाढत चाललेला असंतुष्टपणा व अस्वस्थता कमी होईल.

( ३ ) इंडियन युनिव्हरसिट्यामध्यें हल्लीं फक्त परीक्षा होत असतात तर नवीन प्रोफेसरांच्या व फौजेच्या पगारी जागा करून विद्यादानाचे काम युनिव्हरसिटीकडेस देण्यांत यावें..

( ४ ) आसाम प्रांतांची स्थिती अशी झाली आहे कीं सन १८८२ सालीं जो त्या प्रांतीं जाणाऱ्या मजूरदारा संबंधानें कायदा करण्यांत आला होता तो बंद करण्यांत याव[illegible]

( ५ ) बंगाल, मद्रास, मुंबई व वायव्य प्रांत इकडे जसें लोकमतानें निवडलेल्या प्रतिनिधीस व्हाईसरायच्या कायदे-कौंसिलांत सभासद नेमतात तसें मध्यप्रांताला आपला प्रतिनिधी बहुमतानें निवडण्याचा हक्क देण्यांत यावा.

( ६ ) मुंबई व मद्रास येथील लष्करी वरिष्ठ अमलदारास त्या त्या इलाख्याच्या एक्झीक्युटीव-कौंसिलांत सभासद नेमावें ह्मणजे गव्हरनर साहेबांस मतभेद होऊन दोन्ही पक्षास सारखी मतसंख्या झाल्यास एक निर्णायक मत जास्ती मिळेल.

( ७ ) मद्रास इलाख्यांत व मध्यप्रांतांत जो जमिनीचा सारा कमी कमी मुदतीचा ठराविक केला आहे तो निदान ६० वर्षे मुदतीचा असावा.

( ८ ) रायल कमिशनापुढें साक्षीस जाण्यासाठीं मि. दिनशा एदलजी वाचा यांची निवड मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोशिएशनानें केली आहे ती सर्व राष्ट्रास पसंत आहे. आणि मि. दादाभाई नवरोजी यांच्या देशसेवेविषयी सर्व राष्ट्र फार आभारी आहे व पुन्हां त्यांचा पार्लमेंटांत प्रवेश होईल अशी उमेद आहे.

( ९ ) पुढील वर्षीचा राष्ट्रीय सभा वऱ्हाड प्रांत व मध्यप्रांत यांच्या व्यवस्थेखालीं वऱ्हाड प्रांतांत उमरावतीस किंवा आकोल्यास भरविण्यांत येईल.

( १० ) महाराणी सरकारच्या मंगलनामाचा त्रिवार जयघोष करून अध्यक्षांचे आभार मानण्यांत आले.

राष्ट्रीय सभेची बैठक बरखास्त होण्यापूर्वीं अध्यक्ष नामदार सयानी यांस मुसलमान प्रतिनिधींनीं एक सोन्याचें वख्याळ छेड्या सहित नजराणा दिलें आणि तें घेतेवेळीं अध्यक्षांनीं कळविलें कीं राष्ट्रीय सभेच्या कामांत मुसलमान लोक जो पुढाकार घेतात त्याचें द्योतक ह्मणून ही वस्तु मी घेतली आहे.

---

## The Berar Samachar

MONDAY JANUARY 4 1897

The sessions of the Twelfth Nationa Congress at Calcutta are most successful and well worthy of any national institution in the civilized world. The Congress is no doudt a most powerful organ of the people and as such has gained in weight, dignity and estimation of the local and imperial Governments. The success of the Congress is a crowning triumph of the British rule in India and no *true* Englishman will hesitate to feel pride in the glorious moulding of this vast nationality by his preceding generations. In that light he should look upon the Congress. It is the symbol of the richest inheritance of the British nation and is a permanent organ which will redound to the glory and material advancement of the United Kingdoms.

The deliberations of the Congress are of vast utility even to the world at large. It annually enriches the human treasure of eloquence and political wisdom. India practically pays its quota in sterling and solid lectures of the best of her sons from the Congress-platform. The history of this nation has chequered the whole history of the world and no science of politics will ever be complete if it ignores the main problems the life of this nation suggests. The whole nation is now in a state of transition and possesses a vitality that will probably outlive the ruinous blow of a *foreign* rule in India. The nation, if it falls, will shake nationalities to their foundations and the danger is only avoidable by the rapid assimiliation of the Indian and the English people upon the common ground of the fellow-subjects of Her Majesty the Queen Empress.

---

The hour makes the man but we will rather put it otherwise: the hour shows the man what he is. The good people of the National Congress are glad to meet in Berar in December next; and if god wills it, Rao Sahib Deorao Vinayak will have the 13th National Congress at Akola. We mention with pride his name because when this question of the next year's congress was before us in the last week it was he who stood to welcome the Congress at Akola. We need not tell our readers to mind his ripe old age and the *numerous* sacrifices which he will have to undergo to make the next session a complete success. Rao Sahib Deorao is eminently a public man and it leaves no doubt in our mind that at his call to duty, the people in Berar will flock under his standard. We shall have to show that we have learned to appreciate the lessons of a public life that the Congress has taught for these twelve years. We hope our back—ward people will evidently rise to the magnitude of the great work that our delegates fat the Congress have proposed to ourselves.

---

Some people run mad with the wrong notion that the Berar officers will be a tumbling block in the ways of the Congresswallas. But we assure them that no such thing will happen. The province is now under three eminent Civil Servants:— Messrs Plowden the Resident, Bullock the Revenue Commissioner and Obbard the Judicial Commissioner. With such a *trio* to guide our political aspirations we hope our Berar—officers will excel the most liberal officers in other provinces in point of broad sympathy, right—hand help and general good words of advice. We know Colonel Szczepanski as Commissioner when he inwardly watched, if not directed, with great pleasure our movements in the large public meeting held at Akola in 1894. Mr. Bullock is sometimes rather jocose in his familiar talk but let no one misunderstand him on that account. Mr. Obbard is decidedly a darling jewel of the province and no suspicion can arise in that direction. We need not go further down the ladder if we augur a frank and sincere reception of our congresswallas from our experience of these officers whom we meet often in other fields of public activity.

---

## वऱ्हाड

हवामान—थंडी थोडी पडते पण गारठा विशेष आहे. या सप्तकांत सर्व प्रांतभर थोडा बहूत पाऊस पडला. वारा सोसाट्याचा वाहतो. रोगराई नवीन कांहीं नाहीं.

मुंबईचे कांहीं लोक वऱ्हाडांत राहण्यास आले आहेत कांकीं मुंबईस घरेदारें सोडण्या इतका मळय वळाच्या तापाच्या सांथीनें उडविला आहे.

जी. आय पी. च्या गार्डाचा डबल भत्ता चालू सालीं बंद झाल्यामुळें गार्डांनीं संप केला आहे आणि त्यामुळें मोठ्या पराकाष्ठेनें कांहीं गाड्या अवेळीं तरी येत आहेत. मि० कायली ट्राफिक म्यानेजर आणि पुष्कळ नेटीव स्टेशन मास्तर स्वतः गार्डीचें काम करीत आहेत.

---

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८५ रुपये |
| जवारी | ८४ रु० |
| गहूं ( कांठे ) | १०५ रु० |
| ,, ( बनशी ) | १२० रु० |
| चणे | ८० रु० |
| तेल ६ रु० मण | तूप ७ मण |
| सोनें | [illegible] |
| चांदी | [illegible] |

[illegible] संबंधानें [illegible] प्रसिद्ध केलेला माझे [illegible] पण हा प्रसिद्ध करणें

---

## नोटिस

हयातबी मर्द आयनोद्दिन काजी राहणार कसबे मुळाव प्रगणे उमरखेड तालुके पुसद जिल्हे वाशीम इस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुझेकडून आलेली नोटीस पावली मजकूर समजला तूं आपले बापाबरोबर माझे येथील डागडागिन्यासह कपटानें निघून गेलीस. आह्मी आजपावेतों आपले इजतीस भिऊन राहिलों. कारण कीं, फौजदारखान लुधडीकर याजला तुझे बापानें तुजशीं घरोबा करून दिला. तुला एक मुलगी होऊन ती मैत जाहली. हल्लीं तूं मजला खाण्याचे खर्चाबद्दल ५७० पांचशें सत्तर रुपयानें मागणें केलें. आणि हे रुपये आमचे कडून तुझे बापास १५ दिवसाचे आंत न मिळाल्यास दिलेली नोटीस हीच फारकत आहे असें तूं सुचाविलेंस. तर अशी फारकत कायद्यानें होऊं शकते काय? असेबद्दल तुझेकडून आठ दिवसाचे आंत खुलासा व्हावा. न केल्यास तुजवर पुनर्विवाहाचे संबंधानें फौजदारींत काम चालवून शिवाय लग्नाचे खर्चाबद्दल तुझे बापापासून रुपये २००० दोन हजार भरून घेतले जातील कळावें तारीख २९ माहे दिसेंबर सन १८९६ इ०

सही

आयनोद्दिन वलद फकीरोद्दिन

दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

म्युनिसीपल हद्दींतील जन्म मरणाचें रजिस्टर बरोबर ठेवण्याची तजवीज करण्याकरितां आकोलें म्युनिसीपल कमिटीनें म्यु० कायदा कलम ११६ ( १ ) ( क ) अन्वयें केलेला मसुदा वऱ्हाड म्यु० कायदा कलम १५० यांत सांगितले प्रमाणें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

तारीख १५ माहे ज्यानेवारी १८९७ इ. नंतर ह्या मसुद्याचा विचार केला जाईल. व त्या तारखेच्या आंत सदरहू बद्दलच्या लेखी तक्रारी कमिटीचे आफिसांत घेतल्या जातील. तारीख ३०।१२।९६

Shankar Govidn

सेक्रेटरी.

म्यु० कमेटी आकोला.

नियम १—म्युनिसिपालिटीचे हद्दींत मूल जन्मतांच ७२ तासाच्या आंत त्याच्या बापानें, आईनें, पालकानें अथवा ते हजर नसल्यानें, वारले असल्यानें, आजारी असल्यानें, अथवा अशाच इतर कारणानें माहिती देण्यास असमर्थ असल्यास वरांत असणाऱ्या दुसऱ्या एखाद्या इसमानें अथवा जन्माच्या वेळीं जो कोणी हजर असेल, त्यानें मुलाच्या जन्मा संबंधानें खालील माहिती म्युनिसिपालिटीचे आफिसांत, अगर ज्याच्या ताब्यांत शहरचा तो डिव्हिजन असेल त्या म्युनिसिपालिटीचे डिव्हिजन मेंबरास, अथवा त्याच्या शिपाईस अगर या कामा करितां जो म्युनिसिपल मेंबर नेमला असेल त्यास, अगर कारकून इन्स्पेक्टर असल्यास त्यास द्या[illegible]ली. आता व्याप[illegible]

(१) मूल ज्यांत जन्मलें असेल तो म्युनिसिपालिटीचा डिव्हिजन व रस्ता.

(२) मुलाच्या आईबापाचें नांव.

(३) मुलाच्या आईबापाची जात, धंदा व धर्म.

(४) जन्मलेलें मूल—मुलगा किंवा मुलगी.

(५) मुलाच्या जन्माची तारीख.

(६) मूल जिवंत जन्मलें, अथवा मेलेलें जन्मलें, अथवा जन्मतांच मेलें.

नियम २—म्युनिसिपालिटीचे हद्दींत एखादा मनुष्य मरतांच ७२ तासाच्या आंत त्याच्या कुटुंबांतील एखाद्या इसमानें, अगर असा कोणी इसम नसल्यास, तो गैर हजर अथवा आजारी असल्यानें अथवा इतर अशाच दुसऱ्या कांहीं कारणानें माहिती देण्यास असमर्थ असल्यास. त्या घरांत रहाणाऱ्या दुसऱ्या एखाद्या इसमानें त्या मनुष्याच्या मरणा संबंधानें खालील माहिती म्युनिसिपाल आफिसांत अगर ज्याच्या डिव्हिजनांत तो मेला असेल, त्या डिव्हिजन मेंबरास. अथवा त्याचे शिपायास अथवा शहर सफाई पहात असणाऱ्या म्युनिसिपाल मेंबरास अगर कानसरव्हन्सी इनस्पेक्टर असल्यास त्यास द्यावी:-

(१) मनुष्य ज्यांत मेला असेल तो म्युनिसिपालिटीचा डिव्हिजन अगर रस्ता.

(२) मेलेल्या मनुष्याचें नांव, जात धर्म, वय व पुरुष किंवा स्त्री.

(३) कोणत्या रोगानें मेला व किती दिवस आजारी होता.

(४) मरणाची तारीख.

(५) मेलेल्या मनुष्याचा धंदा.

नियम ३—नियम १ व नियम २ यांच्या अन्वयें माहिती, देण्या करितां कोणी इसम आल्यास त्यास म्युनिसिपाल कामदारानें या खालीं दिलेले नमुने [ अ ] व [ब] स्वतः भरून देण्या करितां ती मागेल तर त्यास द्यावे. त्यानें माहिती दिल्यावर त्यास खालीं दिलेल्या ( क ) नमुन्या प्रमाणें माहिती दिल्याचा दाखला मिळेल.

नियम ४-- नियम १ व नियम २ या अन्वयें आपलें कर्तव्य कर्म असून जो इसम त्या नियमा प्रमाणे माहिती देणार नाहीं व त्याजवर तो गुन्हा मजिस्ट्रेट कोर्टांत शाबीत झाला तर रुपये ५ हून जास्त नाहीं एवढ्या दंडास तो पात्र होईल.

नियम ५- अकोले म्युनिसिपाल हद्दींतील जन्म मृत्यु संबंधी माहिती जमा करण्याची जबाबदारी बीटचे शिपायांवर आहे आणि ही माहिती जमा करण्याचें काम त्यानें नेहेमीचे कामा पैकीं आहेसें समजलें जाईल.

नमुना अ०

| | |
|---|---|
| अनुक्रम नंबर | |
| डिव्हिजनचें नांव. | |
| त्याचें नांव. | |
| आई बापांचें नांव. | |
| आई बापांचा धंदा, जात व धर्म. | |
| मुलगी अथवा मुलगा | |
| मुलाच्या जन्माची तारीख | |
| मुल जिवंत जन्मलें अथवा जन्मतांच मेलें. | |
| माहिती देणाराचें नांव. | |
| माहिती देणाराची सही | |
| शेरा. | |

ता० माहे सन

म्युनसिपल अफिसराची सही

नमुना ब०

| | |
|---|---|
| अनुक्रम नंबर. | |
| डिव्हिजनचें नांव. | |
| रस्त्याचें नांव. | |
| मेलेल्या इसमाचें नांव. | |
| त्याची जात, धर्म व धंदा | |
| पुरुष किंवा स्त्री | |
| वय | |
| मरण्याचें कारण व किती दिवस आजारी होता | |
| मरण्याची तारीख | |
| माहिती देणाराचें नांव | |
| माहिती देणाऱ्याची सही | |
| शेरा. | |

ता० माहे सन

मुनसिपल आफिसराची सही.

नमुना—क०

नंबर

नांव

सदर्हू इसमाचे ! बद्दल दिल्याचा दाखला.

तारीख माहे सन १८९

( म्युनसिपालिटीचा शिक्का )

## NOTICE

The following draft rules for the proper registration of births and deaths within the Municipal limits framed by the Akola Municipal Committee under section 116 (1) (c) are published as required by section 150 of the Berar Municipal Law 1886.

The draft will be taken into consideration after the 15th of [illegible] Objections to them, [illegible] writing, will be received in the Municipal office before that date.

Dated Akola 30th December 1896

Shankar Govind
Secretary
Municipal Committee
Akola.

*Rule* I—On every birth of a child within the limits of the Municipality, the father or the mother or a guardian of the child, or in case of their absence, or death, or inability on account of sickness, or other similar cause, any person living in the house in which the child was born, or any person who was present at its birth, shall within 72 hours from the time of birth give information on the following points at the municipal office, or to the divisional member of the committee in whose division the child was born, or to his peon, or to any other member of the committee appointed for the purpose or the Conservancy Inspector if there is one;—

(1) The division and street of the municipality in which the child was born.

(2) Names of its parents.

(3) Caste, occupation and religion of the parents.

(4) Sex of the child.

(5) Date of the child's birth.

(6) Whether the child was born alive, or was still-born, or whether having been born alive it died immediately after birth.

*Rule* II:—On every death within the limits of the municipality a member of the family to which the deceased belonged, or in case of there being no such member, or such member being unable on account of absence, sickness, or other similar cause, any person living in the house in which the death took place shall, within 72 hours from the occurence of the death, give information on the following points at the municipal office, or to the divisoinal member of the committee in whose division the death took place. or to his peon, or to the member of the committee who has care of the conservsncy and sanitation of the town, or to the Conservancy Inspector if there is one.—

(1) The division and the street of the municipality in which the death took place.

(2) The name, caste, religion, sex and age of the deceased.

(3) The disease causing death and how many days iil.

(4) The date of the death.

(5) The occupation of the deceased.

*Rule* III— Any municipal officer receiving information under Rules I and II from any person shall, if required furnish him with forms in the form given in the appendices A and B to these rules as may be required, and shall, on the receipt of the information, give a receipt to the person furnishing it in the form given in Appendix C.

*Rule* IV.— Whoever refuses or neglects to give information in accordance with Rules I and II, it being his duty under those rules to give information shall, on conviction before a Magistrate. be liable to pay a fine not exceeding Rs. 5.

*Rule* V — The responsibility of collecting information regarding births and deaths within the Akola Municipality shall primarily be with the beat peons and the work of colleoting this information shall be considered a part of their duty.

APPENDIX A.

| | |
|---|---|
| Serial No. | |
| Name of division | |
| Name of street | |
| Names of parents. | |
| Caste, occupation and religion of parents. | |
| Sex of the child. | |
| Date of child's birth | |
| Whether child was born alive or was still-born or died immediatly after birth | |
| Name of informant. | |
| Signature of the informant. | |
| Remarks. | |

Dated 189

*Signature of Municipal Officer*

APPENDIX B.

| | |
|---|---|
| Serial No. | |
| Name of division | |
| Name of street | |
| Name of the deceased | |
| Caste, religion and occupation | |
| Sex | |
| Age | |
| The cause of death and howjmany days il | |
| The date of death | |
| Name of informant | |
| Signature of informant | |

Dated 189

*Signature of Municipal Officer.*

APPENDIX C

Serial No.

*Receipt for having given information of* } *birth and death*

Year 189

Municipality's Seal.

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ... ....८१ ८६
दुसरे खेपेस ........... ८१

Annual in advance 5 Postage] 13 as
Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six months ......... 3 ...... ... ...„ 8 a
Single copy ............... ....... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2
Per line over 10 ... 4 a
Repetition Per line ... as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 11 JANUARY 1897 No 2

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख ११ माहे जानेवारी सन १८९७ इ० अंक २

वऱ्हाडसमाचार

मिती पौष ८ शुद्ध शके १८ ८

गेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं अध्यक्ष नामदार आर. एम. सयानी यांनीं दुष्काळा संबंधानें सांगितलेले उत्तम विचार व सप्रमाण माहिती आह्मी आमच्या मराठी वाचकासाठीं खालीं देत आहों:—

## दुष्काळ

आतां सध्यां सर्वतोमुखी होऊन राहिलेल्या विषयाकडे मी वळतों. वीस वर्षांनीं पुन्हा देशांतील बऱ्याच भागावर दुष्काळ पडला आहे. बहार, वायव्येकडील प्रांत, पंजाब मध्यहिंदुस्थान, मुंबई व मद्रास इलाख्यांतील बराच भाग व म्हैसूर ह्या ठिकाणीं पावसाच्या कमताईमुळें हातावर पोट भरणाऱ्या लोकांचे हाल सुरूं झाले. शेतकऱ्यांची सदैवच दैना. त्याचे हाल तर अतिशयच. दुसरा वर्ग ह्मणजे कारागीर, कोष्टी वगैरे व तिसरा वर्ग रोजीं जेमतेम एक आणा मिळविणाऱ्या रोजदार मोलकऱ्यांचा. दुष्काळ पीडित प्रांतांत धान्याचे भाव अतिशय चढले आहेत कोठें कोठें दीडपट कित्येक ठिकाणीं तर दुप्पट झाले आहेत. हा प्रकार फारच विलक्षण आहे. दुष्काळाच्या आरंभींच गहूं तांदूळ ज्वारी बाजरी ह्यांचे भाव इतके बहुत करून कधींच चढले नाहींत. ह्या स्थितीमुळें जिकडे तिकडे हाहाकार उडावा व नागपूर सोलापूर वगैरे ठिकाणीं लुटी व्हाव्या ह्याची उगज सहज पडणार आहे धान्याच्या कमताईमुळें लोक अगदीं बावरून गेले आहेत. त्यांना सहजींच असें वाटेल कीं अगदीं बाताबेताचाच धान्याचा पुरवठा असून, आरंभींच जर त्याचे भाव इतके चढले तर जसजसा काळ लोटेल व पुरवठ्याला ओहोटी लागेल तेव्हां कसें होईल. अर्थात प्रथम त्यांनीं धान्याचे मारवाडी व्यापाऱ्यांवर जळफळून आपल्या सर्व हालाचें खापर त्यांचे डोक्यावर फोडलें पण जसजशी ही भीति कमी होत गेली व सरकार दुष्काळ पीडित लोकांस मदत करण्यास कसूर करणार नाहीं असें कळलें व सर्वांत अधिक लांब पोचणारा धर्माचाही हात राजनिष्ठेनें सरकारांस मदत करील अशी आशा वाटूं लागली तेव्हां धान्याचे भाव थोडे उतरले. सध्यांची स्थिति ही आहे असें ह्मटल्यास चालेल. सरकारी साप्ताहिक रिपोर्टांवरून असें आढळतें कीं निरनिराळ्या ठिकाणीं मिळून सध्यां दोन लक्षावर लोक दुष्काळाच्या कामांवर आहेत व ती संख्या एप्रिल व मे महिन्या पर्यंत सारखी वाढतच जाईल व त्यावेळीं अशा लोकांची संख्या काय होईल. हें सध्यांच कांहीं सांगतां येणार नाहीं. प्रत्येक प्रांतिक व इलाखाधिप सरकार दुष्काळ निवारणार्थ होईल ती पराकाष्टा करीत आहे ह्या वरून सरकारचा दयाळूपणा चांगला व्यक्त होतो. सुधारलेल्या ब्रिटिश राज्याला आपल्या राज्यांतील लोकांस दुष्काळानें पीडलेलें पाहवत नाहीं. व सेक्रेटरी आफ स्टेटनी (राज शकट धुरीणांनीं) लागेल तितका पैसा खर्चून लोकांचे प्राण वाचविण्याची खटपट करूं असें मंत्रिमंडळांत जाहीर केलें आहे. आतां परमेश्वराजवळ एवढेंच मागणें आहे कीं देशाचे प्रत्यक्ष स्थितीकडे लक्ष न देतां कांहीं तरी कल्पना काढून मनांत आणलेल्या उदार हेतु प्रमाणें करण्याचें सरकार मध्येंच सोडून न देवो ह्मणजे झालें. अन्य उपायांनीं मृत्यू निवारितां येण्या जोगा असतां व्यर्थ आशा करून लोक मृत्यूस बळी पडूं देणें ह्मणजे मोठी दुःखाची गोष्ट आहे. सरकारी कागदपत्रावरून असें दिसतें कीं १८७७।७८ सालीं सुमारें ५० लाख लोक मृत्युमुखीं पडले, हें लक्षांत आणलें ह्मणजे व सरकाराला इतक्या सोई व इतक्या योग्य संस्था सरकारचे ताब्यांत असून जर लोकांस आशा वाटतें तितकें सरकारास सामर्थ्य नसलें अगर तितकी सरकार कडून ह्यांचें दुःखनिवारणार्थ मेहेनत झाली नाहीं तर मग ह्या अशा भयंकर कटू काळांत बिचाऱ्या हिंदुस्थानावर काय प्रसंग ओढवेल त्याची कल्पनेनेंच पोटांत धस्स होते. सद्गृहस्थहो सरकारची मेहेनत व सामर्थ्य कमी होईल असा माझा ह्मणण्याचा उद्देश नाहीं परंतु कोठें कोठें धान्य व गवत पुरेल व पाऊस पडेल वगैरे आशा केल्यामुळें तितकें लक्ष पुरविलें जाणार नाहीं. दुष्काळचा उत्तम कायदा कागदावर लिहिलेला असेल, पण जर त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांचे हातून कसूर झाली (व ती होण्याचा पुष्कळ कारणांनीं संभवही आहे.) तर अन्य मार्गांनीं निवारण्या जोगा असूनही पुष्कळ लोकांस मृत्यु येईल. व ह्मणूनच आपल्या दयाळू राज्यकर्त्यांचे जीव बाचविण्याचे प्रयत्नास हातभार लावण्याचे प्रत्येक नागरीकाचें व सार्वजनिक संस्थेचे कर्तव्य आहे. वर्तमानपत्रें हीं निरनिराळ्या प्रांतांतील दुष्काळपीडीत लोका संबंधानें सर्व प्रकारची माहिती देऊन अमोल कामगिरी बजावीत आहेत. तीं आपल्या कर्तव्याला योग्यशी मोठी उदार कामगिरी बजावीत आहेत व दुष्काळ संबंधानें सर्व देशभर बातमी पसरतात ह्या साठीं आह्मी त्यांचे फार आभार मानिले पाहिजेत. त्यांतों हजार डोळे आहेत. हलगर्जीपणा, निष्काळजी किंवा अयोग्य रीतीनें केलेलें कामही त्यास तेव्हांच दिसतात. आणि योग्य अधिकाऱ्यांना भेट व्यवस्था लावण्यास मदत करतात. आणि त्यांचें प्रथम मुख्य कर्तव्य ह्मणजे मदत योग्य वेळीं दिले जाते व प्राण वांचवणें अशक्य अशा वेळे पर्यंत लांबणीवर टाकली जात नाहीं अशा बद्दल खबरदारी घेणें होय.

परवां ना० बुडवर्ने ह्मणाले त्याप्रमाणें वीस वर्षां पूर्वीं पेक्षां दुष्काळास तोंड देण्यास आज आपलें सरकार ज्यास्त समर्थ आहे हें निःसंशय खरें आहे. १८८० सालापासून दुष्काळ–फंडातून दोन कोटी कालव्यांचीं कामें झालीं व ७ कोटी सरकारचे मदतीनें केलल्या रेलवे झाल्या. त्या नंतर दळणवळणाच्या जास्त सोई झाल्या आहेत दुष्काळांत ह्या सर्वांमुळें कांहीं अशा वाटते. १८७७।८ ह्या पैकीं कांहीं नव्हतें. परंतु सद्गृस्थहो. हें जरी सर्व आपण कबूल केलें तरी, मुख्य रेलवे अगर तिचे दुसरे फांटे पुष्कळ असून, दळणवळणाच्या जास्त सोई झाल्या असून माल नेण्या आणण्याच्या सोई जास्त झाल्या असूनही जर अधिक धान्य असेल अशा ठिकाणाहून कमी असेल तेथें नेण्या जोगा धान्याचा पुरवटाच जर देशांत नसेल तर ह्या सर्व सोईचा आपल्या दुर्दैवानें सध्यां कांहीं उपयोग नाहीं.

तर सध्यां जरूरीचा प्रश्न ह्मणजे कालवे किंवा आगगाड्यांचा नव्हे तर देशांत धान्यसंग्रह किती आहे हा होय. बंगाल प्रांता संबंधानें पाहिलें असतां तेथील सार्वजनिक कामांत मन घालणारे व मेहेनती लेफ्टनंट गव्हर्नर यांनीं परवां पत्र लिहीलें आहे कीं जरी येथें पाऊस थोडा झाला तरी ब्रह्म देशांतील शिलक असलेले व सिंगापूर व सैगांवहून आणलेलें धान्य येथील प्रतास पुरेल. हें पाहून मला फार आनंद होत आहे. त्याच्या वरचा प्रांत त्यांच्याच सारखें मेहनती सर ए. मॅकडॉनेल त्यांचे देखरेख खाली आहे. तेथले लोकें बहुतेक गव्हावर निर्वाह करितात. जरी गुदस्तां ह्या प्रांतांतून बाहेर देशीं पाठविण्या करितां गव्हाची खरेदी कमीच झाली तरी पण येथें गहूं जरा अधिक भावानें कां होईना! पण तो रशियांतून किंवा अमेरिकेंतून आणतां येईल. येणें करून त्या दाट वस्तीच्या दरिद्रि प्रांताच्या गरजा बऱ्याच भागतील वायव्य प्रांतांची व अयोध्या प्रांताची लोक संख्या सुमारें पावणेपांच कोटी आहे हें तुह्मास मी सांगण्याची जरूर नाहीं परंतु हे प्रांत इतके दरिद्री आहेत कीं सरकारी साप्ताहिक रिपोर्टांवरून असें आढळतें कीं ज्यास मोफत धान्य वाटलें त्यांची संख्या व दुष्काळाचे कामावर आलेल्यांची संख्या येथेंच अतिशय आहे. मध्यप्रांत, मुंबई, मद्रास वगैरे येथील धान्याचे पुरवठ्या संबंधानें अंदाज अजून सरकारानें प्रसिद्ध केलेला माझे पाहण्यांत आला नाहीं पण हा प्रसिद्ध करणें जरूर आहे, कारण माझ्यामतें धान्याच्या पुरवठ्याचा अंदाज माहित असला तर व्यापाऱ्यांना व धर्मार्थ वाटणाऱ्यांना जेथें अतिशय जरूर आहे तेथें तेथें बाहेरून धान्य आणवेण्यास बरें पडतें.

C. Shamrao Attache on S. A. I sent for Mr Desai's Tanga on the Nagpunchmi day. The Nazer was at my house that day. He was present when I sent for Mr Moinuddin's Tanga. He couldn't send it. So I sent for Mr Venkutrao's. I don't remember if the Nazar was present. The ladies went in Mr Venkutrao's Tauga and I followed in my dog cart and went to the station, leaving at 10-15 about we drove rapidly. Near the Charitable Dispensary we stopped as something went wrong with the harness. We stayed there for 2 seconds. Up to the Dispensary, my cart was behind, from there to the Press I was ahead. I was close to the tonga 10 or 15 paces off. I don't remember Ananta the Syce talking to any body when the tonga stopped. A relation of mine and Mr Nimkar was in the trap with me. The Syce could have spoken to a man passing without my knowing it. My wife returned from the station in the tonga that went through the garden. I don't know what road the tanga went by. I returned in my own dog cart with Mr Nimkar and Mr Venkutrao Desai.

Interpreted and admitted.

( Signed ) F. W. A. Prideaux
2/9/97 District Magistrate.

Order

The case depends on Riaiji's statement alone. This he has to some extent contradicted in his second statement. His statement is uncorroborated and is insufficient to warrant the proceedings being sent up.

The proceedings to be filed.

( Signed ) F. W. A. Prideaux
2/9/97 District Magistrate.

साल अखेर ,, ७ ,, १ ८

किरकोळ अंकास.................. ४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .......... १ ६
दुसरे खेपेस ........... १

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as
Six monthly........ 3 ...... ... ...,, 8 a
Single copy .............. ...... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 18 JANUARY 1897 NO 3

वर्ष ३१ आकोलां सोमवार तारीख १८ माहे जानेवारी सन १८९७ इ० अंक ३

### जाहिरात.

मुलुक अमानी हैदराबाद यांतील अबकारी हरास सन १८९७--९८ साला करितां

मुलुक अमानी हैदराबाद यांतील सन १८९७—९८ सालाचे अबकारीचे मक्ते हरास हाण्याच्या तारखा खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत.

इलिचपूर, उमरावती व अकोला ह्या जिल्ह्यांच्या मक्त्यांत व बुलडाणा जिल्ह्यांतील मलकापूर तालुक्याच्या मक्त्यांत आफु, गांजा व ताडी ( शिंदी ) विकण्याचे हकाचा समावेश होईल. मुलुक अमानी हैदराबादच्या बाकीच्या भागाच्या ह्मणजे वणी व वाशीम हे जिल्हे आणि बुलडाना जिल्ह्यांतील चिखली व मेहेकर हे तालुके ह्यांच्या मक्त्यांत देशी दारू विकण्याचे हक्काचा देखील समावेश होईल.

प्रत्येक हरास डेपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत होईल. व तो दिवसा १२ वाजतां सुरू होईल.

| | | | |
|---|---|---|---|
| इलिचपूर—गुरुवार, | फेब्रवारी | तारीख | ११ |
| उमरावती— शनिवार, | .. | ,, | १३ |
| अकोला— मंगळवार, | ,, | ,, | १६ |
| वाशीम— शुक्रवार, | ,, | ,, | १९ |
| बुलडाना— सोमवार. | ,, | ,, | २२ |
| वणी- (यवतमाळ) गुरुवार | ,, | ,, | २५ |

तारीख ७ जानेवारी १८९७ इ०

W. HASTINGS, MAJOR,
Offg. Inspector General of Excise
H. A. D.

### नोटीस

सर्वांस कळावें कीं वऱ्हाडांतील शेतकरी व रहिवासी लोक त्यांचे जनावरांस तारीख १५ मार्च सन १८९७ पासून जून सन १८९७ अखेर पर्यंत मेळघाटांतील बंदी जंगलांत पाण्याचे जवळपास मुफत चारण्याची परवानगी मिळेल मात्र त्या लोकांनीं तारीख १५ फेब्रुवारी सन १८९७ चे पूर्वी मेहेरबान डेपुटी कानसरव्हेटर आफ फारेस्ट मुकाम चिखलडा यांचे कडेस ह्या संबंधानें अर्ज पाठवावा. त्या लोकांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं मेळघाटांत पाठविलेल्या जनावरांबद्दल सरकार कोणत्याही प्रकारें जबाबदार होणार नाहीं परंतु त्यांची इच्छा असल्यास मेहेरबान डेपुटी कानसरव्हेटर आफ फारेस्ट यांचे मार्फत मेळघाटांतील गवळी व कुर्कु लोकांस प्रत्येक जनावराबद्दल दरमहा माफक पैसे देऊन त्याचे कडून जनावरांस राखण्याची वगैरे सोय केली जाईल. कळावें ता० २९ माहे डिसेंबर १८९६ इ०

( सही )

सेसिल ब्यागशॉ कानसरव्हेटर आफ फारेस्ट
वऱ्हाड

नमुना ( जी )

नादारी मुकद्मा नंबर १ सन १८९७

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे आकोला.

हिरालाल माणकचंद मालक व्याहरि तर्फे मुखत्यार गणपत शेषराव राहणार पंचगव्हान तालुके आकोट यांस नोटीस देण्यांत येते कीं, भोनाजी व० लाहानाजी कुणबी राहणार सराइ तालुके आकोला हा नादारी आहे असा आज तारीख ९ माहे १ सन १८९७ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ६ माहे २ सन १८९६ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्याकरितां नेमला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते त्याबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केला पाहिजे. कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशीअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख ११।१।९७.

V. N. Dandekar.
Judge
Bankruptcy Court
Akola District.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष १९ शुद्ध शके १८१८

अलीकडे रोजनिशा पुष्कळ तऱ्हेच्या आढळतात व त्यांचा खपही पूर्वीपेक्षां ह्या सात आठ वर्षांत फार वाढला आहे. रोजनिशीचा उपयोग लोक अधिकाधिक करतात ही संतोषाची गोष्ट होय. आणि प्रत्येकानें आपल्या रोजनिशीचे साल अखेरीस सिंहावलोकन केलें आणि त्या आढाव्यात त्याला जर स्वतांची प्रगति व सुधारणा दिसली तर मात्र रोजनिशीचा त्या व्यक्तीनें योग्य उपयोग केला असें आह्मी समजतो. रोजनिशी स्मरणवही सारखी लोक बाळगतात. पण त्या स्मरणवहीचा उपयोग नोंदणीच्या कामापलीकडे झाला नाहीं तर रोजनिशी ठेवण्याचा खरा अर्थ कोणाला साधला असें बिलकूल समजूं नये. आपापल्या दैनंदिन कृतीची परिणति आत्मोन्नतीकडे होत आहे याचा ताळा स्वतांस पहातां यावा असा रोजनिशीचा उद्देश आहे. कित्येक धंदेवाल्यांना पुढील कोणत्या दिवशीं कोणते काम करावयाचें हें दाखविण्याकडे रोजनिशीचा उपयोग होत असतो. पण तें काम कांहीं खऱ्या रोजनिशीचें नव्हे. रोजनिशींत तिथी, वार, तारखा व इतर गोष्टी रीतशीर छापलेल्या असतात ह्मणून रोजनिशीच्या व्यवस्थितपणाचा फायदा न्यायाधीश वकील वगैरे लोकांना होत असतो. जमाखर्चाच्या वह्या जसें आदा व्यय यांचें टिपण ठेवितात तशीं भावी कार्यांच्या टिपणी प्रमाणें रोजनिशीचा उपयोग होत असतो. तथापि तिचा मूळ उद्देश या टिपण वहीच्या कामाचा नाहीं. व्यक्तिमात्र आपला वेळ कसा खर्चितात आणि दिवसानुदिवस कोणची कार्यमाला कशी चालली आहे याचें परिज्ञान ज्याचें त्यास करून देणारी खरी रोजनिशी असली पाहिजे आणि असें परिज्ञान नेहमी आत्मसुधारणेची दिशा दाखवीत असतो. तेव्हां ज्याची रोजनिशी ही दिशा दाखवील ती त्याची खरी रोजनिशी असें आह्मी समजतों. आणि हल्लीं उपयोगांत असलेल्या रोजनिशांचा लोक अशा रीतीनें उपयोग करतील तर आपल्या लोकांमध्यें एक वास्तविक सुधारणा झाली असें आह्मी समजूं. नाहीं तर अलिकडे कित्येक लोक रोजनिश्यांतून वायफळ व दुरुपयोगी गोष्टी लिहीत असतात असें पुष्कळ वेळां आढळतें; ती चाल मोडावी आणि रोजनिशी ठेवणाऱ्यांच्या वर्तनांत अधिक नियमितपणा, शुद्धाचरणाची गोडी आणि हरदिनी कृत गोष्टीचा दोष स्फोट हीं प्रचलित व्हावीं असा रोजनिशीचा उपयोग होत गेला पाहिजे.

आह्मांकडे सालाबाद प्रमाणें रोजनिशा आल्या आहेत त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करतो. कित्येक देशी शाईच्या कारखानदारांनीं आपल्या वस्तूंच्या प्रसारासाठीं रोजनिशांचीं छोटी छोटी सुबक पुस्तकें काढलीं आहेत. तथापि ज्ञानचक्षू सारख्या छापखान्यांतून पुष्कळ वर्षांपासून निघत असलेल्या रोजनिशाहि सुधारलेल्या असून लोकाश्रयास चांगल्या पात्र आहेत.

### हिंदुस्थानची सद्यःस्थिति.

( गेल्या अंकावरून पुढें चालू. )

आणखी हिंदुस्थानच्या जमिनी संबंधानें पाहतां खालील माहिति विशेष उपयोगाची आहेः–

| जमिनीचा प्रकार | एकर दशलक्षाच्या संख्येत. |
|---|---|
| एकंदर | ५३९ |
| लागवडींतली | १९६ |
| पडीत | ३९ |
| लागवडींत येण्यासारखी. | ९९ |
| लागवडींत न येण्यासारखी. | ११३ |
| जंगल | ६२ |

या पैकीं लागवडीतल्या जमिनीच्या प्रत्येक एकरी सारा १ रु० ३ आ० २.४ पें पडतो.

हिंदुस्थानची लोकसंख्या २२ कोट आहे अन्नाची उत्पन्न देणारी जमीन सरासरी १८६ कोट एकर आहे धान्ये प्रत्येक एकराला स-

रासरी उत्पन्न ६९४ पौंड पडतें ह्मणजे सर्व उत्पन्न ९.७६ कोट टन सालीना होतो प्रत्येक माणशी दरसाल ९८९ रत्तल धान्य लागतें ह्मणजे सरासरी दररोज १.६ रत्तल धान्य पडतें. तेव्हां सर्व देशाला धान्य सालिना ९.७७ कोटी टन लागतें. वरील आंकड्यावरून असें स्पष्ट होतें कीं इंडिया देश फार भिकारी आहे. सर्व देशचा मूळ धंदा शेतकीचा आहे आणि कारखान अगदीं थोडे आहेत. इंडियन लोकांचा निर्वाह कसा तरी काबाडकष्टानें होतो, पुष्कळ लोक उपास काढतात आणि कित्येक लोक तर एकवेळ जेऊन दिवस कंठीत आहेत. करांचा बोजा फार मोठा आहे, राज्यकार भाराचा बोजा फार मोठा आहे, राज्यकारभाराचा लष्करी व सिव्हिल खर्च उत्तरोत्तर वाढत असून प्रचंड झाला आहे, आणि सरकारास मोठें कर्ज असूनही कर्जाची रक्कम झपाट्यानें वाढत जाऊन व्याजाखालीं देशाचा चुराडा होत चालला आहे.

नंतर मि. मार्टिन वुड यांनीं तयार केलेले उत्पन्नाचे व खर्चाचे तक्ते सन १८६४ व १८९४-९५ या सालांचे घेऊन तुलना दाखविल्या नंतर अध्यक्ष ह्मणाले कीं दरसाल या देशाला कांहीं मोबदला न मिळतां अडीच कोट पौंड देशांतून बाहेर जात आहेत. आणि हुंडणावळीच्या भावानें अडीच कोटी पौंड ह्मणजे ४० कोट रुपये होतात

एकंदरीनें भावार्थ असा निघतो कीं लोकांस आतां नवीन कर देण्याचें सामर्थ्य नाहीं आणि नवीन कर बसविणें ह्मणजे लोकांस जमीनदोस्त करण्या प्रमाणें आहे. ही स्थिती येणें फार भयंकर आहे.

अशा भावी स्थिती बद्दल सरकाराजवळ कांहीं गोष्ट काढणें किंवा तिच्या विषयीं राजमान्य रितीनें चर्चा करणें ह्मणजे कित्येक राजद्रोहाचे काम समजतात परंतु या वाटाघाटीपासून देशाचा फायदा असून ब्रिटिश राज्याची इमारत अधिक मजबूत व भक्कम होईल. आणि नंतर सर डेव्हिड बारबर, आकलंड कालव्हिन, लार्ड वेलबी इत्यादि मुत्सद्यांचे अभिप्राय सांगून अध्यक्षांनीं कळविलें कीं हिंदुस्थानची स्थिती अशी वाईट आहे तर मुसलमान लोकांनीं राष्ट्रिय सभेला अगोदर आलें पाहिजे.

---

√ लोखंडी आणि पोलादी काम इंग्लंडांतच होतें आणि इंडियांत होत नाहीं असा चुकीचा समज इंडिया सरकारानें मुद्दाम आपला करून घेतला आहे; आणि या समजाचा प्रत्युपकार इंडियावर ब्रिटिश राज्याच्या स्थापनेपासून इतका झाला आहे कीं या देशची लोखंडी व पोलादी शिकलकारी नष्टतेस पावली आहे. हिंदुस्थान सरकारचा एक कायमचा ठराव असा आहे कीं लोखंडी व पोलादी चीजवस्तु इंडियांत विकत घेऊं नये; थेट विलायतेहून स्टोअर खात्याच्या मार्फतीनें त्यांचा पुरवठा केला जाईल. आमच्या राज्यकर्त्यांनीं मूळ व्यवस्था अशी लावल्या नंतर देशी लोखंडी व पोलादी कारखान्यांस कुलुप लागलें यांत आश्चर्य तें कोणतें! इंडियांत सर्व गोष्टी राज्यकर्त्यांस कराव्या लागतात किंवा निदान राजाश्रया खेरीज व राजाज्ञे खेरीज कोणतीच मोठीं कामें घडत नाहींत. उदाहरणार्थ, रेलवे देखील सरकारच्याच हुकूमाखालीं आणि आश्रया खालीं तयार होतात. इंडिया सरकारा सारखें लोखंडी व पोलादी वस्तूंला पृथ्वीवर दुसरें प्रचंड गिऱ्हाईक मिळणार नाहीं. आणि तें गिऱ्हाईक विलायतच्या कारखानदारांच्या मुठींतलें व शद्धांतलें आहे तर इंग्रजी राज्य स्थापित झाल्याच्या वेळे पासून तीन चार पिढ्यांच्या कालांत इंग्लंडचें सांपत्तिक वैभव इतकें वाढलें कीं पृथ्वीवर इंग्लंडाच्या संपत्तीची तोडीची संपत्ती कोठेंच दृष्टीस पडत नाहीं.

पण इंग्लिश राज्यकर्त्यांनीं सर्व कलांचें माहेरघर जो इंडिया देश त्याच्या सांपत्तिक स्थितीचा ऱ्हास केला किंवा त्यांच्या आपमतलबी कृतीचा दुष्ट परिणाम इंडियावर ओढवला यांत कांहीं संदेह नाहीं. इंडियांत एक 'एंजिनिरींग आणि आयर्नट्रेडस' नांवाची एक मंडळी आहे तिनें वारंवार सरकारच्या कृतीचा अनुदारपणा व स्वार्थसाधुपणा चांगला व्यक्त केला आहे. इंडियाच्या लोखंडी व पोलादी मालाला कोणी गिऱ्हाइक नाहीं, हस्तकौशल्य नष्ट झालें, आणि गरज नाहीं ह्मणून यांत्रिक कलेचा हत्ती या देशांत फिरण्याचा संभव नाहींसा झाला. इंडिया देश ह्मणजे इंग्लंड देशाचें मोठें गिऱ्हाईक बनलें आणि त्या गरजेच्या मानानें विलायतेचे कारखाने उदयास आले. आमच्या देशाची कारागिरी नामशेष झाली तथापि सर्व विद्यांचें मूळ बीज कायम असल्यामुळें त्याला अंकूर थोड्या अनुकूळ स्थितींत देखील मोठा जोमाचा येण्यासारखा आहे. ही गोष्ट देशी कारखान्यांच्या सांप्रत भरभराटीनें चांगली स्पष्ट झाली आहे. देशी सुताचे व कपड्याचे कारखाने जरा मध्यमसे चालूं लागल्या बरोबर विलायतच्या गिरणीवाल्यांचे धाबे गडबडलें आणि त्यांनीं आक्रोश करून आकाश पाताळ गुदस्ताच एक केलें होते तें आह्मी विसरलों नाहीं. हाच नमुना देशी लोखंडी व पोलादी कारखान्या संबंधानें घडला आहे.

रेलवे खातें व पब्लिक वर्कस खातें या उभयतांकडे जें लोखंडी व पोलादी सामान लागतें तें पुष्कळसें इंडियांतल्या कारखानदारापासून घ्यावें असा त्या थोर महात्म्या लार्ड रिपन साहेबांनीं सन १८८३ सालीं १० जानेवारीला नंबर १८९ चा ठराव केला आणि तेव्हां पासून देशी कारखाने बरेच निघूं लागले पण पांच वर्षांच्या कालांतच त्या ठरावाला युक्ती प्रयुक्तीनें हरताळ लावण्यांत आला. आणि विलायतच्या स्टोअर खात्याचे पुन्हां फळफळलें! वर सांगितलेल्या एंजिनिअरींग आणि आयर्न ट्रेडस मंडळीनें प्रतिपादित केलें आहे कीं भांडवल पाहिजे तितकें उभारण्यांत येईल, देशी मजूरदारांस हस्तकौशल्य नाहीं तथापि स्वल्प कालांत त्यांस चांगले तयार करितां येतील आणि हल्लीं ज्या वस्तु विलायतेहून आणवाव्या लागतात त्यांचा पुरवठा देशांतच होऊं शकेल. पण आमच्या सरकारची कृपा या देशावर सापत्न माते प्रमाणें आहे. देशी कारखाने चालून हजारो लोक पोटें भरतील असे कारखाने इंडियांत चालूं न होतील अशी व्यवस्था सरकारनें चालविली आहे तर सरकारचे महा पांडित्य प्रजेला धंदेशिक्षण देण्याविषयीं व देशी कलाकौशल्यांस उत्तेजन देण्याविषयीं किती कळकळीचें व सत्यतेचें आहे हें निराळें कळविण्याचें प्रयोजन नाहीं. सरकारचे टेक्निकल एज्युकेशनचे ठराव किती उदारबुद्धीचे आहेत आणि लोखंडी व पोलादी सामान विलायतेहून पुरविण्याचा ठराव किती स्वार्थबुद्धीचा आहे याचा विचार केला ह्मणजे सरकारची वाचा आणि कृती हीं दोन ध्रुवाच्या टोंकाप्रमाणें परस्परापासून दूर आहेत असें स्पष्ट दिसेल. वरील कंपनीनें १८९० मध्यें पुन्हां स्टेटसेक्रेटरीस विज्ञापना केली तेव्हां मोठ्या प्रयासानें सरकारी ठराव झाला तो असा कीं ज्या वस्तूंची गरज निश्चयानें पूर्वी कळून येत नाहीं आणि ज्या विलायतेहून आणविण्यास विलंब लागून नुकसान होण्याचा संभव आहे त्या वस्तु मात्र या देशांत खरेदी करण्यांत याव्या. किती नामी ठराव हा! आमच्या राज्यकर्त्यांच्या शुभ्र यशाला काळिमा आणणारी गोष्ट याहून अन्य कोणती असेल! अप्रतिबंध व्यापाराच्या अर्थशास्त्राला सरकारनें तिलांजली अशा प्रकारानें दिली हें पाहून अत्यंत खेद वाटतो. इंडियाच्या स्थितीच्या मानानें हल्लींच्या व्यापाराच्या शर्यतींत इंग्लंड हा चतुष्पाद भरज्वानींतला केपचा घोडा आहे आणि इंडिया हा एकपाद लंगडा गळाठलेला आरबी घोडा आहे तेव्हां या शर्यतींत काय परिणाम होईल हें उघड दिसत आहे. खरोखर अप्रतिबंध व्यापाराचें तत्व इंडियाला लागूं पडत नाहीं असें असून देखील जर तें देशी सुताच्या व कपड्याच्या गिरण्यांस आयात मालावर कर बसविते वेळीं मोठ्या निधसंतोषीपणानें लागूं केलें तर तेंच तत्व विलायतच्या लोखंडी व पोलादी कारखानदारास समबुद्धीनें कां लागूं करूं नये याची शहानिशा आमचे राज्यकर्ते नेटिवांच्या संतुष्टतेसाठीं करितील तर या देशावर मोठे उपकार होतील.

---

√ राष्ट्रीय सभेच्या गेल्या बैठकींत दुष्काळासंबंधानें जी कळकळीची चळवळ झाली तिचा परिणाम फार चांगला झाला आहे. व्हाईसराय साहेबांस व त्यांच्या कौंसिलदारांस जागृती आली त्यांचें आबादानीच्या गप्पाचें स्वप्न आटोपलें आणि उपासमाऱ्यानें मृत्युवश होत चाललेल्या प्रजाजनांचा टाहो सरकारच्या कर्णरंध्रावर आदळला! विलायतेंतही समकालींच वृद्ध महामुनी दादाभाई यांनीं पुष्कळ प्रयत्न केला आणि अखेरीस विलायतेंत इंडियांतील दुष्काळाच्या निवारणासाठीं धर्मादाय फंड लार्ड मेअर यांनीं लार्ड हामिलटन स्टेट सेक्रेटरी यांच्या अनुमतानें उभारला आहे. आजपर्यंत ३९ हजार पौंड ह्मणजे सुमारें ५ पांच लक्ष रुपये वर्गणी जमली आहे. ईश्वरी योजना काय चमत्कारिक पहा: इंडियाची संपत्ति हक्कानें इंग्लंड लांबविते आणि तिचा कोट्यांश धर्मादायाच्या रूपानें हल्लीं इंडियांत अशा विपत्काळीं परत येणार आहे! रशिया या हतभाग्य अन्नान्न करणाऱ्या देशास मोठी उदार मदत करणार आहे. राजकीय कारणें बरी वाईट कांहीं असोत, या गरजू देशाला अशी मदत कृतज्ञतेनें स्वीकारलीच पाहिजे. आमच्या राज्यकर्त्यांच्या राज्यकारभाराच्या सर्व चुका या वेळीं सहस्रपटीनें मोठ्या अशा दिसून येत आहेत आणि त्या चुका दुरुस्त करण्याचा मार्गही एकच आहे. हा मार्ग ह्मणजे राष्ट्रीय सभेच्या ठरावांचें अनुकरण होय. निदान दुष्काळा संबंधानें राष्ट्रीय सभेचा आक्रोश सरकारानें ऐकिला आणि कांहीं फलप्राप्ती होईल अशी आशा दिसत आहे.

---

दुष्काळ— फंड सर्व देशासाठीं काढण्यांत आला आहे. हा फंड खुद्द महाराणी सरकारच्या आश्रया खालीं जमा होत आहे. गेल्या गुरुवारीं या संबंधाची कलकत्यास जंगी सभा भरली होती त्या वेळीं अध्यक्षस्थान लार्ड एलजिन यांनीं घेतलें होतें. त्यावेळीं एक मुख्य कमिटी स्थापण्यांत आली व तिच्या हुकूमा खालीं प्रांतिक कमिट्या नेमून प्रांतिक कमिट्यांची कामें चालतील. नामदार फ्रेझर यांनीं सूचना आणिली कीं इंडियांतील दुष्काळानें ग्रस्त झालेल्या भागांत दुष्काळाच्या प्रतिकारासाठीं धर्मादाय फंड उभारण्याची वेळ येऊन आतां बेतली आहे; या फंडाचा उपयोग सरकारच्या व्यवस्थेला पाट—मदत देण्याकडे केला जाईल, ह्मणजे जेथें सरकारी व्यवस्थेनें भागत नाहीं किंवा सरकारी मदत पोचूं शकत नाहीं तेथें या फंडाचा उपयोग होईल; देशांतील सधन लोकांपाशी वर्गणी मागण्यांत यावी आणि बाह्य राष्ट्रीय मदत आभारपूर्वक स्वीकारावी. प्रजेच्या प्राणरक्षणाहून अन्य कर्तव्य सरकारास कोणतेंच नाहीं आणि सरकारी पैसा या कृत्याकडे खर्चलाच जाईल तथापि व्हाइसराय साहेबांच्या ह्मणण्या प्रमाणें खानगी धर्मादाया शिवाय कित्येक बाबतींत दादच पोचत नाहीं. दुष्काळांतील पोट भरण्याच्या शिध्या पेक्षां निराळ्या प्रकारचें अन्नदान कित्येकांस अगदीं प्राणरक्षणार्थ अगत्याचें आहे, गोष्यामुळें किंवा मराठमोळ्यामुळें कित्येकांस दुष्काळ—कामावर मोलमजुरी करितां येत नाहीं. त्यांस धर्मादाय पोचविला पाहिजे, आणि जीं मुलेंबाळें आईबापांनीं सोडलीं किंवा ज्यांस नांवा लौकिकासाठीं अन्य गोष्ट करणें मरणप्राय होतें त्या मुलांस किंवा अन्य मनुष्यांस धर्मादायानेंच वांचविले पाहिजे. नामदार वुडबर्न साहेबांनीं कळविलें कीं सध्यांच सात आठ लक्ष लोक दुष्काळाच्या मोल मजूरीवर काम करीत आहेत आणि नामदार महादेव गोविंद रानडे यांनीं मुंबईस दर्शविलेलें दुष्काळचें चित्र डोळ्यापुढें ठेविलें ह्मणजे दुष्काळानें केवढा कहर उसळला आहे याची कल्पना ह गेले महिने होते. सुखाचे होते पण पुढें येणारे महिनेच मोठ्या दुःखाचे, संकटाचे आणि विपत्तीचे आहेत. त्याच्यातून हा देश कसा निभेल तो खरा परमेश्वरावर हवाला ठेवून प्रत्येक मनुष्यानें आपल्या शक्तीप्रमाणें आपल्या आप्तांस, शेजाऱ्यांस, प्रांतिकांस व देशबंधूस या संकटेवळीं मदत केली पाहिजे. अन्नदाना सारखा धर्म नाहीं आणि हा धर्म करिते वेळीं

कोठें तो विशेष उपयोगी पडेल हें लक्ष्यांत ठेवून काय तें केलें पाहिजे. ईश्वरानें सुस्थितींत ठेविलें याचा अर्थच आपण त्याच्या कृतीचें मंडन परोपकारानें केले पाहिजे. आयुष्याची सार्थकता जर परोपकारांत होऊं शकेल तर हल्लींच्या काळा सारखी दुसरी उत्तम वेळ कधींच येणार नाहीं.

---

गेल्या १९ वे तारखेच्या प्रमोदसिंधू वरून कळतें कीं १३ राष्ट्रीय सभा उमरावती शहरीं भरेल असा ठराव कायमचा झाला आहे. वऱ्हाडांत राष्ट्रीय सभा भरणार आहे हें आतां खास आहे पण आमच्या माहिती प्रमाणें आकोला किंवा उमरावती शहर सभेसाठीं कायम करावयाचें याचा निर्णय अजून व्हावयाचा आहे. मोठ्या आनंदाची गोष्ट कीं राष्ट्रसेवेचे वारें उभय स्थळींच्या लोकांत चांगलें खेळूं लागलें आहे आणि पूर्व वऱ्हाड व पश्चिम वऱ्हाड या दोन भागामध्यें एका प्रकारची अभिनंदनीय स्पर्धा सभास्थळा विषयीं लागली आहे. गेल्या संक्रातीच्या दिवशीं आह्मास आमच्या पुढारी मंडळी मध्यें जो पराकोष्टेचा व देशासाठीं स्वार्थत्याग दिसून आला तो पाहून सर्व राष्ट्र माना डोलवील. इतक्यांत आठ हजारावर वर्गणी जमली आहे. इंडियन लोकांचें एक राष्ट्र कसें बनत चाललें आहे याचें प्रत्यंतर आमच्या मागसलेल्या वऱ्हाड प्रांतांतही भावी राष्ट्रीय सभे विषयीं चालू असलेल्या चळवळीवरून अनुभवास येईल.

---

# The Berar Samachar

MONDAY JANUARY 18 1897

If there be any department that is most progressive and regular in its working, most useful to every one, perfectly self supporting and lucrative to the Government, it is the Postal Department. We have on our table the annual report of the Post Office of India for the year 1895—96. For some years past the pecuniary responsibilities of the Post Office have been constantly increasing owing to the expansion of money order business, and Government was right in taking special steps to secure that no servant of Post Office who is not in receipt of a fairly substantial rate of pay should be required to accept any serious money responsibility. We learn that the Value Payable Post is utilized in Panjab for obtaining copies of official documents. In the same province money order system was adopted also for paying the salaries of the school masters who are also in most cases the village Post Masters. A new system that of thumb impression has been introduced in lieu of the signatures of the illiterate with a view to secure evidence for the purpose of indentifying the payee if necessary. How far the measure is of practical value is yet to be seen. On an average we have one Post Office for every 136 square miles and one letter box for every 49 square miles. The average number of Postal articles used by population that can read and write is 34.32 per head.

The most interesting department is the Dead Letter Office. Just as there is a marked increase in the use of Post Cards &c. so also there appears to be a proportionate increase in the negligence of the people in as much as it would appear from special statistics kept at all Dead Letter Offices for March 1895 that about 800 letters, 1800 post cards, 1000 newspapers and 350 packets reach our Dead Letter Offices every month without any address at all! and 2,660 news papers and 1200 packets without covers. In articles opened only in the more important Dead Letter Offices were found cheques, currency notes, jewellery and other property amounting in value in all Rs. 2,99,411, £ 1,768,175 37 Francs 31 centimes, and 236 Dollars In this report we learn of a curious practice of Marwadi traders of the Bombay presidency, of sending to members of their firms who have gone back to Rajputana heavy packets containing iron, wood or waste paper on which no postage is paid with the object of suggesting to them the necessity of returning to work. We, however, believe it is done either through sheer wanton mischief or with spirit of vengeance as to make the person addressed pay a heavy postage for things of no value!

During this year the Post Office has not progressed in one single Department: Savings Banks Department. In all 41 Saving Banks offices were closed though the amount deposited during this year was a little over 367 lakhs as against 326 lakhs in 1894—95. Let no body misconstrue the fact and say that the financial position of the lower classes in India is in no way worse It simply proves that people are alive to the hardness of times and perhaps scrape together something to lay by against hard times—though not without a pinch just at present. The closing of the 41 Savings Bank offices and this small increase in the deposits are facts significant of the poverty of India and alas! there are people who will persist in declaring that India is the land of gold

We wonder how many more things this Department is going to undertake. The Post Office is a carrier and deliver of letters; of parcels. It insures not merely articles but lives of some of its servants. Thus it is an insurer. It is a banking firm. It has of late turned chemist too! It sells quinine. It is a government agent to collect salt Revenue. We shall not be surprised on one of these days if it will assume all the functions of "a general merchant!" In America the Post office acted the part of guide too! One young lady "posted" herself to a place she did not know. She was immediately conveyed and "delivered" at the address given in safety with as much ceremony as a parcel is delivered.

---

The deadly foe (famine) threatens to develop in large tracts of the nation very rapidly and seriously. The latest rains have no doubt improved the situation a little but the danger is still there with all its sternness. The outlook is dismal though the Goverment asserts in full voice its preparedness to meet it. We doubt very much the real strength of the Government when the magnitude of the work runs beyond all optimistic expectations. The National Congress sounded the bugle of alarm and we are glad to note that it is rightly acted up to. The Honourable Sir Woodburn thus summarizes the present condition of Indian affairs;—

"Even with this saving help, the situation is very grave. Nearly three-quarters of a million of people are already in receipt of relief, and it is certain that numbers must very largely increase before any diminution whatever can take place. The task of providing relief for these enormous numbers is gigantic and will demand the utmost energy and circumspection on the part of the local authorities to make it efficient.

"The Government of India have given and will continue to give to the Local Governments unstinted help in money or men. They grudge no expenditure that is necessary to meet it. On the local officers, however, fall all the real stress and strain of the management of the operations. They have given in the past year gallant response to the call of this great duty, and the Government of India know that they can rely on their civil officers of all ranks throughout India to fulfil that duty to the very utmost limit of human endeavour."

Lord Elgin affirms it with right earnestness and makes the following observation which, we hope, will prove true to prestige and glory of the British rule in India.

"There is, however, one word of caution which I must not omit. I desire to say most emphatically that as a Government, and for the purposes of Government, the Government of India has had, and will have, nothing whatever to do with an appeal to private subscriptions. As a Government we have undertaken certain obligations: those obligations we are perfectly able to perform, and we shall accept no help. We have endeavoured to set them forth; but, in the words of Salisbury, they must be 'distinct from the obligation devolving upon Government.' Our means are ample; our determination to use them is absolute. I speak in this matter for the whole of my colleagues, and for none of them more than for my hon'ble friend in charge of the Finance Department. I can say from personal knowledge that Local Governments gratefully recognise that in this connection they are being met with the utmost consideration and liberality, and I feel the most complete confidence that, whatever the criticism of our action in this emergency may be, in one respect, at all events, we shall not fail to secure the verdict of the historian, *i.e.*, in our making available for the saving of life the full resources of the Empire."

## वऱ्हाड

हवामान—थंडी विशेष पडते. गार वारा सोसाट्याचा वाहतो. बुलढाणा व इलिचपूर जिल्ह्यांतील रब्बीच्या पिकाला गेल्या पावसामुळें थोडा जोर आला आहे इलिचपूर व उमरावतीकडे हवेचा उपद्रव थोडाथोडा चालूं आहे. दुष्काळाचीं कामें लवकर सुरूं हेतिल तर बरें होईल.

कर्नल सी. टी. लेन सी. आय. इ. इंडियन स्टाफ कोर, डेपुटी कमिशनर वर्ग १ आणि पोलिस, तुरुंग, नोंदणी, स्टांप व अबकारी या खात्यांचे इनस्पेक्टर जनरल यांची चाकरी लष्करी खात्याकडे तारीख ११ दिसेंबर १८९६ पासून परत करण्यांत आली ह्मणजे या तारखे पासून त्यांनीं पेनशन घेतलें असें कळतें.

रा. रा. विष्णु नारायण बापट एम. ए. यांचा राजीनामा मंजूर होऊन हायस्कुलांतील त्यांच्या जागेवर रा. रा. रामचंद्र आबाजी पन्हाळकर हेडमास्तर, जळगांव यांस बदललें. आणि तेथील शाळेवर रा०रा०रघुनाथ वामन देवभानकर बी. ए. यांस उमरावती हायस्कुलांतून बदलण्यांत आलें. आणि त्यांच्या जागीं १०० रुपये पगारावर रा. रा. गोखले एम. ए. यांस बढती दिली.

रा. रा. विष्णुनारायण डांगे बी. ए., शंकर नारायण डांगे बी. ए. आणि नारायण मोरेश्वर रहाळकर बी. ए. यांच्या जागा अनुक्रमें १५०, १००, व ६० रुपये पगारांच्या सब प्रो[illegible]या कायम झाल्या.

---

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८९ रुपये |
| जवारी | ८१ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२॥ रु० |
| ,, ( बनशी ) | १२९रु० |
| चणे | ९० रु० |
| तेल | ६ रु० मण |
| तूप | ६॥ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८१ |

नोटीस

नोटीस बेशमी मोतीराम लछीराम मालक चुनीलाल गणेशलाल तर्फे मुक्त्यार हर गोविंद जोधराज दुकान नांदुरें यास खालीं सही करणार याजकडून तुमचे तारीख ७।१।९७ इसवीचे शुद्धवऱ्हाडी पत्रांतील अंक १ मध्यें आह्माला आमचे दिलेले नोटिशीचें प्रत्यूत्तर.

१. तुह्मी सदर्हू पत्रांत दिलेल्या नोटिशींत जो मजकूर लिहिला आहे तो अगदीं खोटा आहे. आह्मी सदरील शेताचे विक्रीसंबंधानें तुह्मास तारीख ३०।१।९६ इसवी रोजीं तुमचे नोटिशीचें उत्तर दिलेच आहे ते तुह्मास पावल्याचे तुह्मी सदर्हू पत्रांत कबूलच करिता, परंतु तुह्मी लिहिता कीं रुपये ३५०० मध्यें सदर्हू शेताचा सवदा झाला आहे व रुपये कांहीं पावले नाहींत हें तुमचे लिहिणें अगदीं खोटें आहे असें लिहिण्यानें कांहीं फुकटच रुपये मिळत नसतात.

२. आतां तुह्मी जर तारीख ३०।१२ १८९६ दिलेल्या नोटिशी प्रमाणें व्यवस्था न केली तर सर्व जबाबदारी तुमचेवर राहील आह्मी तर तुमचे बाकी राहिलेले रुपये १४९९ (अक्षरीं चौदाशें नव्व्याणव रुपये) तुह्मास पूर्वी सुचाविल्याप्रमाणें दुसरें सराफाजवळ अनामत ठेविले आहेत त्याप्रमाणें खरेदीखत करून देऊन आमचा निकाल करावा. तसें न केल्यास तुमचेसी कोणतेही प्रकारचो मी नुकसानीचा जबाबदार नाहीं. या संबंधानें मला जो जो खर्च ज्या ज्या वेळेस झाला व होईल व त्या योगानें जी माझी नुकसानी होईल त्याजबद्दल तुह्मी जबाबदार असून सर्व तुमचे जवळून भरून घेतले जाईल. कळावें, तारीख १६।१।९७ इसवी.

सही

करिम खान खुदाबस खान

दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार.

हृदयद्रावक गोष्ट—धारवाडास रेल्वेंत रा. रा. बापूराव आगाशे या नांवचे एक क्लार्क आहेत त्याच्या तरुण मुलाला एका महिन्याखाली देवाज्ञा झाली. यंदांच हा मुलगा इंटरमीजियटच्या परीक्षेला बसला होता. त्या मुलाच्या अगदीं तरुण कुटुंबानें व त्या मुलीचे मातोश्रीनें गेल्या शनिवारी तुंगभद्रा नदींत जीव दिल्याचें समजतें. स० शो०

ग्रंथिक तापाच्या कारणाच्या शोधार्थ नेमलेल्या कमिटीचे अध्यक्ष मुंबईचे सुप्रसिद्ध डाक्तर म्यान्सर हे गेले बुधवारीं त्या तापानेंच वारल्यामुळें मोठा घोटाळा झाला !

हिंदुस्थानच्या लोकांस वाटेल तेथें उतरूं द्यावयाचें नाहीं असा तेथील लोकांनीं निश्चय केला असून हिंदुस्थानच्या लोकांनीं भरलेलीं तशीं कांहीं गलबतें तेथील बंदरांत गेलीं असतां त्यांस बंदरांत येण्याची मनाई केली आहे. हिंदुस्थानचे लोक बंदरांत उतरूं लागतील तर कांहीं दंगा होण्याचाही संभव आहे असें सांगतात.

विलायत व हिंदुस्थान यांच्या दरम्यान रोजच्या रोज डाक येण्या जाण्याची व्यवस्था करण्याचा विचार चालू आहे. अलेक्झांड्रियापासून हिंदुस्थानापर्यंत बसोरा व पार्शीयावरून कराची व मुंबई येथें येणारी एक आगगाडी करण्याचा विचार आहे. जर्मनी व टर्की हे दोघे मिळून जी एक रेलवे करीत आहेत ती लवकरच बगदाद येथें येण्याचा संभव आहे. बसारा व बगदाद यांच्या दरम्यानच्या रेलवेंत इंग्रजांची एक पेंढी असूं नये असें जर्मनी व टर्की यांचें ह्मणणें आहे.

दारावीच्या मच्छीमार लोकांनीं मुंबईच्या लोकांस साथीमुळें आपल्या हद्दींत येण्याची बंदी केली असून तशा आलेल्या एकदोघांस बराच मारही दिला.

जपान व मुंबई यांच्या दरम्यान एका जपानी कंपनीच्या आगबोटी चालू झाल्या आहेत.

हिंदुस्थानच्या जंगलखात्यांतल्या रालच्या प्रतीच्या नोकरांच्या पगाराचें रिविजन करण्यास स्टेट सेक्रेटरीची मंजुरी झाली. यांत २,८०,००० रुपये खर्च वाढणार आहे.

हिंदुस्थान व अफगाणिस्थान यांच्या दरम्यानची सरहद्द कायम करण्याचें जें काम चालूं आहे त्यांत काबूल व कुनर या नद्यांच्या दरम्यानच्या हद्दीबद्दल कांहीं लढा असून त्याचा निकाल करण्याकरितां अमीर स्वतः त्या ठिकाणीं येऊन इंग्रज सरकारच्या कामगारांस भेटणार आहे.

क्रीट बेटांत पुन्हा दंगा सुरू होऊन ख्रिस्ती व मुसलमान प्रजेंत बरीच मारामारी झाली व बरेच लोक ठारही झाले. राज्यकारभारांत करावयाच्या सुधारणेस मुसलमानलोक हरकत आणीत आहेत.

बचुनालाड येथें पुन्हा कांहीं गडबड सुरू झाली आहे.

मुंबईची अर्धी वस्ती जरी उठून गेली तरी राहिलेल्यांतल्या गरीब लोकांकरितां स्वस्त्या भावानें धान्य विकण्याचें मुंबईस एक दुकान सुरू झालें.

पंजाबांत अलीकडे चांगला पाऊस पडल्यामुळें दुष्काळाची भीती नाहींशी झाली आहे असें सांगतात.

अलीकडच्या पावसानें निझामाच्या राज्यांतल्या शेतकीस चांगली मदत झाली व दुष्काळ बहुत्येक नाहींसा झाला. मेडक, इंदुर, वरंगल, एलगंडल, मालगुंदा व शिरपूर या जिल्ह्यांत तर दुष्काळाचें आतां मुळींच भय राहिलें नाहीं. ठा० अ०

शिकारपूर येथील पंडित स्वरुपदास ह्यानें मुंबई येथील टाइम्सला तारेनें कळविलें आहे कीं, मुंबईमध्यें एका दिवसांत मांस मासळी व दारू ह्याचा जितका खप होतो तितके जिन्नस जर आपणाला हवन करण्याला मिळतील तर आपण सांथीच्या तापापासून मुंबईची मुक्तता करण्याचा जिम्मा घेतों. आणखी एक अट अशी आहे कीं, ज्या दिवशीं हवन व्हावयाचें त्या दिवशीं मुंबई शहरामध्यें मोठें जनावर मारिलें जातां कामा नये. निमंत्रण आल्याबरोबर मी मुंबईला येण्यास तयार आहे आणि त्याबद्दल मला वाटखर्ची किंवा पगार कांहींही नको.

गोदावरी व्हॅली करण्याचें ठरलें. ही रेल्वे शिकंद्राबादहून निजामाच्या राज्यांतून औरंगाबाद, जालना, परभणी, व नांदेड या वाटेनें मनमाड येथें जी. आय. पी. रेल्वेस मिळणार. लांबी ३८७ मैल असून खर्चाचा अदाज दोन कोटीचा आहे.

हिंदुस्थान सरकार त्यांच्या कामाला लागणारा मिळण्याजोगा सर्व माल या देशांतच खरेदी करीत असून नेटिव्ह राजे बहुतेक माल विलायतेहून आणितात हें बरोबर नाहीं अशी तक्रार अंग्लो इंडियन वर्तमानपत्रें करीत आहेत. ती रास्त आहे असें आह्मांसही वाटतें. न्या०

कागद तयार करण्याकरितां चिंध्यांच्या व रद्दी कागदाच्या कित्येक गासड्या घेऊन एक बोट मुंबईहून कलकत्यास गेली होती, परंतु अमलदारांनीं मुंबईतील तापाच्या सांथीच्या भीतीमुळें त्या सर्व गासड्या जाळून टाकल्या.

रेल्वेंत आग—पंजाबांत फिरोझर स्टेशनाजवळ एका मालगाडींत आग लागली होती तींत बऱ्याच मालाचें नुकसान होऊन कांहीं बैल व माणसेंही मेलीं.

कलकत्यासारखीच कराची येथें तापाची सांथ उठल्याची चळवळ सशंयित रितीनें सुरू असून शिकारपुरी बनये तें शहर सोडून चालले आहेत.

राष्ट्रीय सभेचा मंडप यंदा भाड्यानें घेतला असल्यामुळें सामानिक परिषदेस बऱ्याच भाड्यावर मिळाला.

अलीकडे एक्सरेज ह्या किरणांचा प्रयोग हातावर फारवेळ झाला असतां त्याचीं नखें गळून पडतात आणि डोक्यावर झाला असतां केंस गळून पडतात. परंतु तो प्रयोग फुफ्फुसावर झाला असतां त्यांतील क्षयरोगबीज नाहींसें होतें. अशा कितीएक विलक्षण गोष्टी प्रत्ययास येत आहेत. आ० व०

खिशांत ठेवतां येण्याजोग्या बायसिकलच्या पायगाड्या नुकत्याच तयार करण्यांत आल्या आहेत. खिशांत मावणाऱ्या पेटींत ही गाडी ठेविली असेत. एवढ्या पोकळींत त्या गाडीचे सर्व अवयव पृथक् करितां येतात व पाहिजे तेव्हां पुन्हां सर्व भाग जुळवून फिरावयास जाण्याच्या उपयोगीं ही गाडी पडते.

एका शास्त्रीय शोधकानें चाकांवर घर बांधण्याची युक्ती काढली आहे व तो दोन तीन महिन्यांत ते चालू करणार आहेत.

इंडिअन चायनामधील एका प्रांताच्या जंगलांत कांहीं तऱ्हेचीं माणसें वसतात ज्यांस शेपूट असतें असें प्यारिसच्या एका पत्रांत प्रसिद्ध झालें आहे!

मुंबई इलाख्यांत मागील आठवड्यांत १३८७०२ मनुष्यें रिलीफ कामावर काम करीत होतीं. न्या. सिं.

मि० देशमुख यांची सोलापुराहून बदली झाली त्याचें कारण तेथें ठेविलेले लष्करी लोक यापुढें ठेवण्याचें कारण नाहीं असा देशमुखांनीं अभिप्राय दिला; परंतु पोलिस सुपरिटेंडेंट व कमिशनर मि० रपेन्ड यांचें ह्मणणें त्या विरुद्ध पडलें आणि देशमुखास कारवारास जावें लागलें हा त्याचा परिणाम आहे.

नवीन दिवा—बेल्ज्यम देशांत एक नवीन दिवा बनविला आहे. असला दिवा आजपर्यंत कोणीही तयार केला नाहीं. ह्या एकाच दिव्यामध्यें निरनिराळे ३००० प्रकार करितां येतात! हा दिवा सहा फूट पर्यंत ऊंच होऊं शकतो व त्या दिव्याचा घेर पावणेचार फूट बनवितां येतो. तसेंच, ह्या दिव्याच्या प्रकाशांत ६०० फूट लांबीवर पुस्तक वाचतां येतें ह्या दिव्यांत डुकराच्या चरबीचें तेल जाळण्यांत येतें.

बर्फाची वृष्टी—आजकाल हिंमालय पर्वतावर बरीच बर्फाची वृष्टी होत आहे. तिकडील लोकांची अशी समजूत आहे कीं ज्या वर्षी बर्फाची जास्त वृष्टि होते त्या वर्षी देशांत विपुल पर्जन्य वृष्टि होते. या वर्षी अनुभव कसा काय येतो तो पहावा.

√ मि० दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं लंडन येथें ग्रेटब्रिटन मधील हिंदी गृहस्थांची एक मोठी सभा भरली होती. तींत दुष्काळाचें निवारण करण्याचें कामीं हिंदुस्थान सरकारानें जी हिंमत दाखविली आहे तीबद्दल आभार मानून त्यानें हिंदुस्थानांतून परदेशीं वाहून जाणाऱ्या धान्यास आळा घालण्याचे उपाय योजावे कारण वारंवार दुष्काळ पडण्याचें कारण तेंच आहे, अशा अर्थाचे ठरावाचा विचार केला, पण त्यावर हिंदुस्थानसरकाराचे आभार मानण्याची वरील ठरावामधली गोष्ट काढून टाकावी अशी प्रतिसूचना पास झाली आणि लॉर्ड मेयर ह्यांनीं हिंदुस्थानचे दुष्काळ निवारणाचा एक फंड उभारावा असा असा ठराव सुद्धां पास झाला. आणि त्याप्रमाणें वर्गणी गोळा करण्याची व्यवस्था झाली.

हिंदुस्थानांत पाठविण्यासाठीं पुष्कळ धान्य रशिया मधून घेऊन ऑडेसा येथें जमा होत आहे. दि० बं०

सोलापूर—इतक्यांत पाऊस न पडेल तर मागच्या पेऱ्याचीं पिकें ४१ देखील येण्याची आशा नाहीं. पोटासाठीं लोक उठून जाण्याचा क्रम चालूच आहे. रिलीफ कामावरील मजुरांची संख्या ४०००० वर व काम न करणाऱ्या मुलांची संख्या २१००० वर गेली असून १२३ गांवांत मिळून १२०२३ लोकांस धर्मार्थ अन्न देण्यांत येत आहे. गुरांचा एकसारखा संहार चालला आहे. धारणेचें मान मागील आठवड्याप्रमाणेंच आहे. आसपास कांहीं गांवीं हेवचा उपद्रव सुरू आहे.

सांगोलें तालुक्यांत रिलीफ कामावरच्या लोकांना पाणी देखील हवें तितकें मिळेनासें झालें आहे. दोन दोन तीन तीन मैलांवरून पखालींनीं पाणी आणून [फक्त पिण्यापुरतें मोठेंक २।३ तांबे पाणी देण्यांत येतें असें कळतें! स्नानाचें व कपडे धुण्याचें तर नांवच नको.

गेल्या ३ महिन्यांत एकट्या शेफर्ड कंपनीच्या आगबोटीनें मुंबईहून १२४९० लोक तापाच्या भीतीनें बाहेर गांवीं निघून गेले. इतर आगबोटींनें व रेलवेतून गेलेले वेगळेच. यावरून एकंदर लोक किती गेले असतील यांचा अदाज करावा.

म्युनिसिपालिटीच्या किंवा लोकलबोर्डाच्या इलेक्शनमध्यें सरकारी कामदारांनीं ढवळाढवळ केली तर त्यांना बडतर्फ केलें जाईल, असें खैसूर सरकारानें जाहीर केलें आहे. क. त.

विलायती न्याय—आपण न्याय करितों तो अगदीं निर्दोष असतो अशी विलायती न्यायाधिशांस मोठी घमेंड आहे, परंतु ती किती पोकळ असते हें पुढील उदाहरणावरून दिसतें. नार्थहाम्टनशायर येथील एका मजुरावर घरास आग लावल्याचा आरोप होता तो आरोप त्यावर पूर्ण रीतीनें शाबीद आहे असें न्यायाधिशांनीं ठरवून त्याला त्यांनीं ९ वर्षे सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा दिली. मी गुन्हा केला नाहीं असें आरोपी पिंजऱ्यांतून धूम बोंबले पण त्याचें कोणी ऐकले नाहीं. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर एक दिवस तेथलेच पाद्री बोवा कोर्टांत येऊन न्यायाधिशापुढें वदूं लागले कीं—"अहो, घराळाचा तो गुन्हा मी केलेला आहे; त्या निरपराधी मजुराला ९ वर्षांची शिक्षा तुह्मीं दिलीत ती व्यर्थ आहे. असें त्या इमानी आगलाव्या पाद्र्यानें न्यायाधिशाचे डोळ्यांत अंजन घातल्यामुळें लगेच त्या निरपराधी मनुष्यास बंधमुक्त करून त्याचेच पोषाखांनीं पाद्री बुवास मंडित करून तुरुंगाची कोठडी शोभविली!!


## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातांत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ९ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent


☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 as
Single copy ............... ...... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

VOL XXXI AKOLA MONDAY 25 JANUARY 1897 NO 4
वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २५ माहे जानेवारी सन १८९७ इ० अंक ४

## नोटीस

सर्वांस कळावें कीं वऱ्हाडांतील शेतकरी व रहिवासी लोक त्यांचे जनावरांस तारीख १५ मार्च सन १८९७ पासून जून सन १८९७ अखेर पर्यंत मेळघाटांतील बंदी जंगलांत पाण्याचे जवळपास मुफत चारण्याची परवानगी मिळेल मात्र त्या लोकांनीं तारीख १५ फेब्रुवारी सन १८९७ चे पूर्वी मेहरबान डेपुटी कानसरव्हेटर आफ फारेस्ट मुकाम चिखलडा यांचे कडेस ह्या संबंधानें अर्ज पाठबावा. त्या लोकांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं मेळघाटांत पाठविलेल्या जनावराबद्दल सरकार कोणत्याही प्रकारें जबाबदार होणार नाहीं परंतु त्यांची इच्छा असल्यास मेहरबान डेपुटी कानसरव्हेटर आफ फारेस्ट यांचे मार्फत मेळघाटांतील गवळी व कुर्कु लोकांस प्रत्येक जनावराबद्दल दरमहा माफक पैसे देऊन त्यांचे कडून जनावरांस राखण्याची वगैरे सोय केली जाईल. कळावें ता० २१ माहे डिसेंबर १८९६ इ०

(सही)
सेसिल ब्यागशॉ कानसरव्हेटर आफ फारेस्ट
वऱ्हाड

## जाहिरात.

मुलुक अमानी हैदराबाद यांतील अबकारी हरास सन १८९७--९८ साला करितां

मुलुक अमानी हैदराबाद यांतील सन १८९७—९८ सालाचे अबकारीचे मक्ते हरास हाण्याच्या तारखा खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत.

इलिचपूर, उमरावती व अकोला ह्या जिल्ह्यांच्या मक्तयांत व बुलडाणा जिल्ह्यांतील मलकापूर तालुक्याच्या मक्तयांत आफु, गांजा व ताडी ( शिंदी ) विकण्याचे हक्काचा समावेश हेईल. मुलुक अमानी हैदराबादच्या बाकीच्या भागाच्या ह्मणजे वणी व वाशीम हे जिल्हे आणि बुलडाना जिल्ह्यांतील चिखली व मेहेकर हे तालुके ह्यांच्या मक्त्यांत देशी दारू विकण्याचे हक्काचा देखील समावेश हेईल.

प्रत्येक हरास डेपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत होईल. व तो दिवसा १२ वाजतां सुरू हेईल.

| | | | |
|---|---|---|---|
| इलिचपूर—गुरुवार, | फेब्रवारी | तारीख | ११ |
| उमरावती— शनिवार, | .. | „ | १३ |
| अकोला— मंगळवार, | ,, | „ | १६ |
| वाशीम— शुक्रवार, | ,, | ,, | १९ |
| बुलडाना— सोमवार, | ,, | ,, | २२ |
| वणी- (यवतमाळ) गुरुवार | ,, | ,, | २५ |

तारीख ७ जानेवारी १८९७ इ०

W. HASTINGS, MAJOR,
Offg. Inspector General of Excise
H. A. D.

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent

श्रीबालासाहेब देऊळगांवराजा ह्या संस्थानास सरकारी वेतन वगैरे कांहीं नाहीं. पण व्यापारी लोक नफ्याचा कांहीं अंश बालाजीचे नांवाचा निराळा करून ठेवतात व वर्षातीं सर्व जमलेली रक्कम दर आश्वीन महिन्यांत देवास स्वसंतोषानें समर्पण करितात. या देणगीस कानगी असें ह्मणण्याचा प्रवात आहे, कानगीचें उत्पन्न सहा सातहजार रुपयांपासून लाख रुपयापर्यंत होत आलें आहे असें ह्मणतात या उत्पन्नाची वर्षाची सरासरी काढली तर तीस पासून पस्तीस हजार रुपये निघेल असा अजमास निघाल्याचें ऐकिवांत आहे. व खर्च सरासरीं २९००० रुपये यात्रेंकरितां व बारमाही खर्च १०।११ हजार एकूण खर्च उत्पन्ना इतका होत असतो. आतां वाचकांनीं हें लक्ष्यांत आणलें पाहिजे कीं, संस्थानेंच उत्पन्न अनिश्चित असून तें खर्चापूर्वीं येत नाहीं. नेहमीं खर्च अगोदर करावा लागतो, व त्या खर्चाचे रकमेंत फारसा फरक पडत नहीं ह्मणजे खर्च मामुलीपूर्वीं होऊन जातो आणि उत्पन्न कमी झालें ह्मणजे अर्थात् संस्थानास तूट येते. जितकी तूट तितकीच कर्जाची रक्कम होऊन ती व्याजानें वाढत जाते.

यंदा सात हजार रुपये कानगीचें उत्पन्न झाल्याचें ऐकिवांत आहे. यंदाची व्यवस्था चांगली होती, ह्मणून सुमार पांच सहा हजार रुपयांपेक्षां ज्यास्त कर्ज नाहीं, नाहीं तर या वर्षी महागाई पाण्याचे दुर्भिक्ष सर्व प्रकारची अडचण यांचा विचार केला असतां निदान १०।११ हजार रुपये नवीन कर्ज जरूर व्हावयाचें तें निमे रकमेवर भागविलें हें व्यवस्थापकांस भूषण आहे. धर्मादाय खर्च बिदागी वगैरे फार कमी झाला मुळींच केला नाहीं ह्मटलें तरी चालेल. ललिता पर्यंत ब्राह्मण भोजन व फकीर फुकरा यांस कोरान्न दररोज वाटण्यांत कमतरता झाली नाहीं. वस्तुस्थितीचा विचार करून खर्चाचें मान कसें बसवितां येईल तें पुढच्या खेपेस सुचविण्यांत येईल.

पिण्यास पाणी नाहीं, जनावरांस चारा नाहीं. धान्य मुळींच मिळत नव्हतें पण हल्लीं जरी फार महाग तरी पैसा असल्यास मिळतें. एकंदरींत लोक उदास आहेत. कोणाचाही धंदा सुरळींत चालत नाहीं. या वेळेस ईश्वरावांचून कोणी त्राता नाहीं. सबब त्याचेंच चरणीं लीन होऊन हा लेख पुरा केला आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ७ शके १८१८

मि. मलीक नांवाचे एक इंडियन विद्यार्थी इग्लंडांत कायद्याचा अभ्यास करीत आहेत. तेथें कालेजाच्या व्हालंटीअर पलटणी मध्यें नवीन भरती होऊं लागली तेव्हां मि. मलीक हें स्वतां व्हालंटीअर होणार होते. पण ते नेटीव असल्या मुळें त्यांस पलटणींत घेतलें जाणार नाहीं असा रोकडा जब व मिळाला, या बाबदींत मोठी चळवळ झाली तेव्हां लश्करी खात्याचे मुख्याकडे अर्ज झाले आणि लार्ड लान्स डौन यांनीं कळविलें कीं नेटिवास व्हालंटीअर पलटणींत घेऊं नये असा प्रतिबंध कोणत्याच कायद्यानें येत नाहीं. पण या मताचा कांहीं फायदा अद्याप झाला नाहीं नेटिवासंबंधानें किती मत्सरभाव दाखवितात याचें हें ढळढळींत उदाहरण होय. या उदाहरणाचा ग्रंथ लवकर आटपण्या सारखा नाहीं ह्मणून पक्का निकाल होईपर्यंत सध्यां. आह्मी अधीक लिहित नाहीं.

हत्याराच्या कायद्यानें वऱ्हाडांत मोठा त्रास झाला आहे. परवान्या शिवाय घरीं जुनीं हत्यारें देखील असूं द्यावयाचीं नाहींत असा नियम १८९९ मध्यें झाला पण त्याची प्रसिद्धी जशी भरपूर व्हावयास पाहिजे तशी न झाल्यामुळें पुष्कळ लोकांस हा नियम देखील ठाऊक नाहीं. आणि ह्या कारणानें कित्येक लोकांवर विनाकारण पोलिसांची बालंटें आलीं आणि त्यांस अति त्रास सोसावा लागला आहे. अद्याप या अशा महत्वाच्या नियमा विषयीं लोकांचे अज्ञान आहे इतकेंच नाहीं तर जर कदाचित् हा नियम कोणास कळला तर नियम कळे पर्यंत परवाना घेतला नाहीं ह्मणून पोलिसांच्या भितीनें नवीन परवाना घेण्यास देखिल कित्येक धजत नाहींत. आणि त्यामुळें एका चुकीची परंपरा अनेक चुकांनीं वाढत चालली आहे. आमची स्थानिक सरकारास अशी विनंती आहे कीं त्यांनीं जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर साहेबांच्या मार्फतीनें हत्याराचा नियम सर्व लोकांस समजून सांगावा, नवीन परवानें घेण्याविषयीं मुदत द्यावी आणि रयतेवर उगीच संकट न येईल अशा बेताबातानें या नियमाची अंमलबारी करून घ्यावी.

हा नियम चांगला आहे असें मात्र कोणी समजूं नये. राष्ट्रीय सभेनें हत्याराच्या कायद्या संबंधानें जो ठराव केला आहे तो निदान स्थानिक सरकारानें शिकावा असें आमचें त्यांस सविनय ह्मणणें आहे.

मुंबईचा वळाचा ताप फार वाढला आहे. मुंबई सारखें शहर ओसाड पडत चाललें आहे आहे आणि दररोज शेपन्नास माणसें या साथीला बळी पडत आहेत ही मोठी दुःखा

ची गोष्ट होय. अगोदरच दुष्काळानें लोकास गांजून टाकलें आहे आणि तशांत ही तापाची सांथ मुंबई सारख्या कामधंद्याच्या व लक्षावधि लोकांच्या पेट भरण्याच्या शहरीं वळावऱ्यां मुळें फार अनर्थ उसळला आहे. मुंबई सोडून किती लोक परागंदा झाले याची गणतीच बरोबर होत नाहीं. हजारो माणसें आपापल्या शक्तिप्रमाणें जीव वाचविण्याच्या खटपटीस लागले. मुंबईच्या आसपास लोक जाऊन राहिले. गिरण्या, कचेऱ्या, दुकानें वगैरे बंद पडण्याच्या स्थितींत आलीं आहेत. या वळाच्या तापावर बस्ताद असें रामबाण औषध अद्याप आढळलें नाहीं. या तापा पुढें कोणाचाच इलाज चालत नाहीं असें झालें आहे. एकंदर स्थिती मोठी भयंकर होत चालली आहे. वर्तमानपत्रकर्ते लिहितात कीं माणसाच्या कमताईमुळें वर्तमानपत्रें सुद्धां नीट निघूं शकत नाहींत. ईश्वर लवकर कृपा करून ही सांथ बंद करील तर बरें !

सारा वसूल करण्याची वेळ आली आहे. लोक मोठ्या फिकिरींत आहेत. कापसाचा भाव अगदीं उतरला आहे. खऱ्या शेतकऱ्यास जवळचा दाणा विकतां येत नाहीं. सरकारी फाळा तर दिला पाहिजे असें चमत्कारीक गूढ कोडें लोकांच्या पुढें आहे. आमच्या अकोल्या जिल्ह्यांत तर रब्बीचें पीक बिलकूल नाहीं. धान्याचे भाव अती महर्गतेचे आहेत. लोकांच्या जवळ कांहीं त्राण नाहीं आणि जे निव्वळ मोलमजूरी करणारे आहेत त्यांच्या हाल अपेष्टेला सीमाच नाहीं. दुष्काळाचीं कामें निघणार निघणार असें ह्मणतां ह्मणतां जानेवारी महिना पाऊण लोटून गेला. सरकारानें साऱ्याच्या बाबदींत लोकांस पुष्कळ सवलती दिल्या पाहिजेत असें आह्मांस वाटतें; स्वताचें कुटुंबाचा भार अगोदर लोकांस भारी वाटत आहे. शिवाय या दुष्काळानें पीडलेल्या आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या मागण्या प्रत्येका पुढें दत्त ह्मणून उभ्या आहेत. तथापि सरकारी सारा देणें घरदार व अब्रू राखण्या साठीं वेळेवर दिलेंच पाहिजे असा सर्वत्र समज होऊन चुकला आहे. ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन सरकार दयार्द्रतेनें कांहीं सूट व माफी देईल अशी आह्मी उमेद बाळगतों.

## अर्ज करा.

(शेत साऱ्याच्या तहकुबी किंवा माफी बद्दल.)

अलिशान रेसिडेंट मि. प्लौडन यांनीं नुकतेंच एक सरक्युलर काढलें आहे. हें सरक्युलर सध्याच्या स्थितीला फार अनुकूळ आहे. सर्व मुलकी अधिकाऱ्यांस असा बट हुकूम फर्मावला आहे कीं सरकारी सारा वसूल करितांना कडकपणा धरूं नये आणि गरीब रयतेला पीडा होईल अशा प्रकारानें सारा वसूल करण्यांत येऊं नये, प्रसंग विशेषीं पक्की खात्री झाल्यास साऱ्या बद्दल तहकुबी देण्यांत यावी आणि खरोखरच नापेर झाली असली किंवा अगदीं नापीक असलें तर सारा माफही करण्यात यावा. दुष्काळा संबंधी जो सरकारी कायदा आहे त्यामध्यें साऱ्याच्या तहकुबी विषयीं किंवा माफी विषयीं नियम घालून दिले आहेत ते पाळण्यांत यावे. हें सरक्युलर किती चांगलें आहे आणि किती ऐन वेळेवर निघालें आहे हें सहजींच कळून येत आहे. प्रांताचे कमिशनर मि. बुलक साहेब यांच्या शिफारशी वरून हें सरक्युलर फर्माविण्यांत आलें असो, किंवा प्रत्यक्ष मि. प्लौडन यांच्याच दयार्द्र विचारामध्यें त्याची उत्पत्ती असो, असा लोकहिताचा हुकूम मोठ्या नामी वेळेवर सुटला हें रयतेचें मोठें भाग्य होय आणि या उपकृती बद्दल सर्व प्रजाजन स्थानिक सरकारचे मोठे ऋणी आहेत

नियम चांगला घालून ठेविला तरी त्याचा खरा चांगुलपणा तो बरोबर पाळण्यांतच विशेष असतो. साऱ्याच्या वसुला विषयीं सरकारी हुकूम रयतेस अनुकूळ असा आहे तथापि तो चांगल्या रितीनें अंमलांत आणण्या विषयीं जिल्ह्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनीं अती दक्षता ठेविली पाहिजे आणि तालुक्या निहाय हाताखालील अंमलदारा मार्फत मोठ्या खबरदारीनें व चौकसपणानें हा नियम अंमलांत आणविला पाहिजे. अशा दुष्काळाच्या प्रसंगीं सरकारी अंमलदार काळजी घेतील तितकी थोडीच आहे. साही जिल्ह्यांतून हा नियम योग्य प्रकारें पाळता यावा ह्मणून कांहीं पेट नियम अंमलदारांच्या माहिती साठीं व प्रजेच्या उपयोगासाठीं सर्व प्रांतभर प्रसिद्ध करण्यांत यावे.

सरकार साऱ्याची तहकुबी किंवा माफी देते असें कळल्या बरोबर प्रत्येक नंबरदार कुळानें सरकारी दयेचा दुरुपयोग होईल अशा भानगडींत पडूं नये. सरकारी सारा हा कांहीं सहसा सुटत नाहीं कां कीं तहकुबीचे व माफीचे नियम मोठ्या बारकाईचें आहेत. सरकारी अंमलदार प्रत्यक्ष चौकशी शिवाय साऱ्या संबंधी सवलती देत नाहींत आणि खोट्या नाट्या दीनपणाच्या आरडण्याला ते कधींही भीक घालणार नाहींत. अर्थांत खरा शहाणपणा असा कीं ज्याला वास्तविक साऱ्याची तहकुबी किंवा माफी पाहिजे असेल व ती ज्याला सरकारी नियमा अन्वयें मिळण्या सारखी असेल त्यानेंच सरकारा जवळ दाद मागावी. उदाहरणार्थ शेताचा पेराच झाला नाहीं, किंवा पेरा होऊन पुढें खर्च भागण्या इतकें देखील उत्पन्न झालें नाहीं तर अशा वेळीं कुळानें साऱ्याची माफी मागावी; तसेंच शेत नीट पिकलें नाहीं, पीक रुपयांतलें आठ आणेही हातीं लागलें नाहीं, आणि घरच्या प्रापंचिक अडचणीही पुष्कळ अनिवार्थ आहेत तर सरकारापाशीं साऱ्याची तहकुबी मागण्या विषयीं धांव घ्यावी. माफी मागावयाची असेल तर ती सर्व किंवा अंशमात्र पाहिजे अशा विषयीं स्पष्ट खुलासा करावा. तहकुबी विषयीं देखील असेंच धोरण ठेविलें पाहिजे. आह्मी मोघमांत आमचें मत दर्शविलें आहे. तें सरकारास कबूलच असेल असें कोणी समजूं नये. या पेक्षांही विशेष विचारानें व अधिक अनुभवानें कांहीं गोष्टी नवीन सूचतील त्या लोकांच्या माहिती साठीं आह्मी वेळोवेळ प्रसिद्ध करूं.

आह्मी मागें असें सूचविलें होतें कीं प्रत्येक गांवांच्या पीकाची सरासरी घेऊन साऱ्याचीं तहकुबी किंवा माफी देतां येणार नाहीं. आणि यंदा तर सामान्यपणें सारखीं पीकें गांवोगांव आलीं नसल्यामुळें सरासरीच्या धोरणावर कांहींच अनुमान बसवितां येत नाहीं. त्याशिवाय एकदम सर्वांनीं मिळून कांहीं ओरड केली तर तिच्या खरेपणा विषयीं खात्री होणें कठीण असतें आणि ती फुकट जाते. तेव्हां प्रत्येकानें निरनिराळा अर्ज करावा हें आह्मास बरें वाटतें आणि असाच सल्ला आह्मी थोड्या दिवसा पूर्वीं दिला होता. प्रत्येक नंबरदार कुळानें अर्जांत आपल्या शेताचा नंबर. एकर गुंठे व आकार नमूद करावा. शेताच्या पिका विषयीं तपशीलवार माहिती द्यावी आणि शेवटीं जी दाद पाहिजे असेल ती स्पष्टपणें खुलाशानें कळवावी. थोड्या दिवसा पूर्वीं वऱ्हाडची प्रांतिक सभा भरली होती त्यावेळीं या संबंधानें सरकारापाशी दाद मागितली होती आणि ती दाद अंशतः तरी देण्या विषयीं प्रांतिक सरकारानें मनावर घेतले आहे या बद्दल सर्व रयत सरकारास दुवा देत आहे.

यंदा वऱ्हाडांत राष्ट्रीय सभा भरणार आहे आणि ती मागील बारा सभा प्रमाणें टोलेजंग होईल असा अंदाज आहे. येत्या सभेच्या व्यवस्थे विषयीं व तिला लागणाऱ्या खर्चाच्या वर्गणी विषयीं आमची प्रांतिक पुढारी मंडळी निरनिराळ्या सभा भरवून बातबेत व योजना करीत आहेत तेव्हां वऱ्हाडच्या लोकांस अशा महत्कृत्याला त्याला किती खर्च लागणार आहे याची कांहीं अटकळ यावी ह्मणून आह्मी पुण्यास भरलेल्या ११ व्या राष्ट्रीय सभेच्या जमाखर्चाची माहिती आह्मी देत आहों. ही छापील माहिती रा० रा० काशिनाथ परशराम गाडगिळ व गोपाळ कृष्ण गोखले, सेक्रेटरी यांच्या कडून आह्माकडे आली आहे. सन १८९५ सालीं वर्गणीची रक्कम रुपये ३८६५९-५-८ पै होती आणि त्या शिवाय मुखत्यार व प्रेक्षक यांच्या टिकीटांचें उत्पन्न रुपये २३३६६-२ आणे झालें. या शिवाय इतर किरकोळ बाबीचें उत्पन्न मिळून रुपये ६५८००-११-६ एकंदर उत्पन्न झालें. कांग्रेसचा मंडप वगैरे इमारती काम व इतर तत्संबंधी खर्च मिळून रुपये १४०३१--१--२ पै झाला. तारा पाठविल्या त्याचा खर्च रुपये १०३२-४-६ पै होता. या शिवाय जेवणाखाणाचा खर्च, छपाईचा खर्च आणि इतर नाना बाबी मिळून एकंदर सर्व खर्च रुपये ४६४९२ -२ आणे झाला आणि बाकीं शिल्लक रुपये २०३०८-९-६ पै. राहिली आहे. ह्या वरील आंकड्या वरून साधारण अनुमान होईल कीं राष्ट्रीय सभा ह्मणजे एक मोठ्या खर्चाची संस्था आहे. राष्ट्रीय उन्नति कांहीं सुखानें व आपोआप होत नाहीं. प्रत्येक चांगल्या गोष्टीसाठीं कांहींतरी मोबदल्यांत खर्च करावा लागतो, आणि राष्ट्रीय उन्नति आपणास सर्व बाजूंनीं ह्मणजे आपल्या तनूला, मनाला व धनाला झीज लागल्या शिवाय लाभणारी नाहीं. असें हें महत्वाचें कार्य यंदा विशेषेंकरून मध्य प्रांताकडे व वऱ्हाडाकडे सर्व राष्ट्रानें सोपविलें आहे आणि मध्य प्रांतस्थ मंडळीच्या जरा ढिलाईमुळें व आमच्या प्रांतस्थ मंडळीच्या उत्साहामुळें ही राष्ट्रसेवा यंदा वऱ्हाडच्या हिश्याला पुष्कळ येणार आहे. आपल्या प्रांताच्या मानानें हें कार्य फार मोठें आहे. हत्तीचें काम मुंगीनें पतकरावें तशी व्यवस्था वऱ्हाडच्या लोकांनीं केली आहे. आमच्या कार्यसिद्धीला अनुकूलता फक्त ओतप्रोत उत्साहे, शरिर झिजविण्याची तत्परता आणि यथाशक्ति पैसा खर्चण्याविषयीं दृढ संकल्प या तीन गोष्टींची आहे. ईश्वर कृपेनें वऱ्हाडवासी राष्ट्र भक्त यशस्वी होतील अशी आह्मास पूर्ण उमेद आहे.

सरकारी नौकराचा राष्ट्रीय सभेच्या फंडास वर्गणी देण्याविषयीं पुष्कळसा गैरसमज दिसतो. राष्ट्रीय सभेंत सरकारचें अंग असूं नये असा मूळचा उद्देश सरकारी हुकूमाचा आहे. अर्थात ज्या रीतीनें सरकारी अंमलदार राष्ट्रीय सभेच्या खटपटींत शेरिक होणार नाहींत असा बंदोबस्त पाहिजे आहे; पण सरकारी अंमलदारास राजकीय मतें असूं नयेत किंवा त्यांनीं त्या मताच्या विजयासाठीं कोणत्याही सद्हेतुक गोष्टी सरकारी हुकुमाला संभाळून करूं नयेत असा कांहीं भावार्थ नाहीं. सभेला प्रेक्षक ह्मणून जाण्याविषयीं खुद्द व्हाइसराय साहेबांची परवानगी आहे. सरकारचें अंग दिसेल अशा प्रकारचीं कार्यें मात्र सरकारी अंमलदारांनीं आपल्या अंगावर घेऊं नयेत, राष्ट्रीय सभेला वर्गणी देणें ह्मणजे कांहीं गुन्हा होत नाहीं. फक्त सरकारी हुकुमाची अमान्यता न होईल अशा रीतीनें वर्गणी दिली ह्मणजे सर्व बरोबर व यथाशास्त्र झालें. गुप्त संज्ञे खालीं वर्गणी राष्ट्रीय सभेला जर कोणी देईल तर सरकारी हुकूम मानला जाऊन त्याच्या हातून राष्ट्रीय सभेची देखील सेवा होईल. अशा वर्गणीला लांचाचें स्वरूप नाहीं हें पक्के ओळखलें पाहिजे. लांच दिला ह्मणजे गुन्हा होतो; तो गुप्त आहे तो पर्यंत त्याबद्दल शिक्षा होत नाहीं आणि उघडकीस येतो तेव्हां गुन्हेगारास शिक्षा होते. राष्ट्रीय सभेस दिलेल्या वर्गणीची गोष्ट तशी नाहीं. गुप्तस्फोट होण्याचा अगोदर संभव नाहीं आणि वर्गणी देणाऱ्यानें आपलें नांव सरकारी नोकरीचा संबंध तुटल्यावर प्रगट केलें तरी देखील तो गुन्हा होत नाहीं. राष्ट्रीय सभेच्या कार्यांत शेरीक असूं नये एवढाच सरकारी हुकूम आहे पण राष्ट्रीय सभेला वर्गणी देऊं नये अशी कांहीं सरकारची मनाई नाहीं. सारांश, राष्ट्रीय सभेला निदान द्रव्यद्वारा मदत राजमान्य रितीनें करिता येणार नाहीं असें सरकारी चाकरांनीं समजूं नये.

आकोला मुनसिपाल कमिटींत नवीन आठ सभासदांच्या निवडणुकी येत्या आठवड्यांत व्हावयाच्या आहेत निवडानिवडी संबंधानें वार्ड नंबर एक मध्यें पुष्कळ चळवळ आहे. वार्ड नंबर २ व ३ मध्यें उमेदवार लोक अगदीं बेताबाताचेच आहेत. उमेदवार पुष्कळसे असले ह्मणजे निवडणुकीच्या वेळीं मताधिकारी लोकांची मत देते वेळीं तारंबळ उ-

डते. मत देण्याचा ज्यांस अधिकार आहे त्यांनीं मत देण्यास जाण्याविषयीं काळजी ठेवावी. मतप्रकाशनानें उमेदवार असलेल्या गृहस्थास इर्ष्या येते आणि लोकांच्या विश्वासाला अनुरूप अशी कामगिरी बजावण्याची त्याला हुरूप वाटेतें मत देतांना प्रत्येकानें निर्भिडपणा धरावा. आपणास जो गृहस्थ अनुभवावरून, ओळखीवरून किंवा मिळविलेल्या माहितीवरून पसंत असेल त्यासच मत देण्याचा धडा सार्वजनिक आयुष्यांत पहिला आहे आणि तो आमच्या आकोलेकरांस चांगला यावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. उमेदवारांचे गुणावगुणांची पारख आपापल्या मनानें करावी आणि नंतर निष्पक्षपात बुद्धीनें मत देण्यास सिद्ध व्हावें. अशी सिद्धता नसेल तर भाडोत्री किंवा मेहरबानी मत देण्या इतका स्वतांला हलकेपणा आणून घेऊं नये. मत देण्याचें काम निरुपद्रवी आहे आणि निदान तें चोख रीतीनें जर कोणी बजावण्यास चुकेल तर त्या इसमास काय संज्ञा द्यावी. हे आह्मांस कळत नाहीं. मी मी ह्मणणारे लोक देखील या साध्या व सोप्या कर्तव्यांत अंतर पाडतात असें बहुतकरून सर्वांच्या अनुभवास आलें असेल आणि ही चूक घडूं नये ह्मणून आह्मी मुद्दाम वरील सूचना केल्या आहेत.

## The Berar Samachar

MONDAY JANUARY 25 1897

The famine of 1896—97 is fast deepening amongst the lower classes and threatens to become a living death to the middling classes in the society. With all the prospects of the winter crops the famine develops to grow more and more actue and intense. It is really very hard to meet satisfactorily such al general famine of the greatest magnitude. We are gla that the Government of India owns the obligations which as a National Government it has to discharge, and is rather sanguine in its hopefulness of averting the evil effects of the deadly foe. We are afraid however that the Government is highly optimistic and oversanguine in its preparedness for the calamitous distress. The relief works afford no doubt a helping hand to the starving millions but beyond these there is a larger circle of people to whom the relief works afford no friendly help The extreme difficulty is to consult the safety of lives of these middling people who can neither beg nor know where to find means of living. It is for these people mainly that charity funds are instituted and the Government of India has laid down sound principles of making charity reach these helpless people. A serious distress is coming over the whole country and one is at a loss to understand how the measures and the reliefs proposed by the Government will be adequate and significant so as to minimize the worst dangers of famine days and of the days that follow the famine. We express our confidence in Government but at the same time our sense of their helplessness under the present policy pictures a—new all the disadvantages of a foreign rule in India. If famine is beyond human control it is never—the—less the worst of famines because of the continual drain of the public money which a foreign rule like the British Raj entails in the sequel. The Times of India thinks it to be a transparent nonsense when the National Congress connects the famine with the largely expensive administration of India. The initial causes of Famine are no doubt drought and similar ones but a famine is telt the more as a famine because the people are sinking the more into the depths of poverty and starvation and the latter condition of the people is due to nothing else but to the black side of a Foreign rule which undermines the material wealth of the country and paralyses all its productive industries. Granted that the machinary of Government before the British advent was highly expensive, it never the less retained the money in the country itself. The only hope of relieving the country of the consequences of famines lies in the libera adoption of the policy advocated by the National Congress. At this critical moment the solvency of the nation is at stake though English Statesmen may speak in glowing terms of its large borrowing powers. The Government cannot afford to remit taxes and the funds at their disposal are but few. So in this direction of reducing taxations the Government must confess to their utter inability. The only means left are, therefore, to beg for alms; even to do this simple thing the Government had to be pressed on all sides, and we have now under the patronage of Her Majesty the Queen Empress a fund started under the name of the Indian famine relief fund. We learn that some eighty thousand pounds have been subscribed to in the course of the last fortnight and the fund will run to high figures worthy [of the noble traditions and of the immense riches of the British Nation.

---

We are obliged to Mr. Plowden, the Resident at Hyderabad for a circular directing remissions and suspensions o the Land Revenue in cases of grave and extreme necessities. He advocates the liberal policy of not bringing undue pressure against the people in the collection of the Land Reveue. The circular is the most opportune and benevolent in its character. We hope that all civil officials will do full justice to the spirit of the circular and show to the public at large that the Local Government of Berar is conspicuous for its public policy of helping the agricultural Ryots at this time of need.

---

The following is the authoritative statement about the condition of the crops in Berar. We fail to see how it tallies with the stern facts before us:—

" In the Berars an eight-anna autumn crop was reaped, which has sold well. The anticipations are of an eight—anna winter crop, and rain has recently fallen in the part which needed it most. It is anticipated that some help will be necessary in the districts of East Berar but West Berar will probably escape any severe failure."

We put ourselves the simple question whether the above picture is not drawn in imaginary rosy colours. Our experience answers it in the affirmative.

---

To

The Editor,
Varhad Samachar.

Dear Sir,

Will you, please, draw the attention of the authorities that be, with your own support, to the following.

In the evening the letter boxes of the town are cleared before 5 p. m. every day. Now, we have only two deliveries here—one in the morning before 10 a. m. and the other in the evening before perhaps 5 P. M. But generally all men of business ( officers included) have little time to write off their replies in the firms or offices. So that the only time they get to write their letters is their leisure time at home. The replies are, therefore, written generally before they go to bed. But the letters are detained for more than 12 hours owing to the Post Office having set its face against the convenience of the public.

Indeed, the first mail at night leaves here at about 1 a. m. I do not see why the letter-boxes are not cleared at about 10 P. M. There will then be time enough for sorting them &c.

It may be urged that the General Post Office is closed at 7.30 p. m. and the P. O. at the Railway station is left open for the convenience of the public and that it is the merchants that want that Post Office open. But really I cannot see the utilty of this arrangement. All merchants live in the city and certainly not close tc the station. They themselves complain of having to send off a man at night to post their letters. This too they have to do before 10 p. m. as the man also takes his own time to *walk* to the station, no merchant condescending to give him his own carriage and horse ( if he has any ! ). Others, of course, want the clearauce to be made before 10 p. m. in the town.

It may also be urged that a very small number of letters are found in the letter—boxes in the town in the evening. That is easily explained. Even replies to the morning letters are hastened off in time and posted by men going to their offices either on the side of the General Post office or on the station side. So that letters written in the morning time are not detained. And as it is practically useless to post the evening letters after 5—30 p. m. people do not take the trouble of going to the letter-boxes simply to have the satisfaction of seeing that they will be safe there till 10 a. m. the next day ! Thus the evening correspondence is invariably detained owing to this silly arrangement.

Post offices are always self—supporting— nay paying concerns and the more so the more they look to the convenience of the public.

It will never, therefore, be urged that if the boxes are cleared at 10 p. m. a despatching clerk will have to be detained in the P. O. or that if the whole clearance be sent off to the Railway station Post office there will be a strain on the mail agent there. It is the duty of the Department to make every arrangement to carry out these reforms for the convenience of the public.

Besides if this clearance be small there will be no special strain upon the despatching clerk, and if it be large, it is high time that another hand were added to prevent this detention of such a large number of letters.

It is another question why a city P. O. should not be opened just between the Old city and new addition or the Paith. But, I believe, it will be a great boon to the Akola public, if even this most imperative reform be first carried into effect. You will certainly not hesitate to make room in a corner of your paper for.

Akola, 24th January 1897 } Yours &c. A New Resident.

## वऱ्हाड

हवामान= अभ्रें मधून मधून पुष्कळ येतात. गेल्या गुरुवारीं विजा चमकत होत्या व थोडा पाऊसही पडला. थंडी कमी आहे. काल गडगडाट होऊन पाऊस पडूं लागला.

क्याप्टन ओ. जी. आयर्व्हर्स असि. कमिशनर व माजिस्ट्रेट वर्ग १ आकोला यांस समरी माजिस्त्रेटचे संपूर्ण अधिकार देण्यांत आले.

मि. आवर्ड जुडिशिअल कमिशनर हे येत्या मार्च महिन्या पासून सहा महिन्यांच्या रजेवर जाणार आहेत. त्यांच्या जागीं कोण गृहस्थ येतात तें पहावें.

वऱ्हाड- हायस्कुल- माजी- विद्यार्थी समाजाचा वार्षिक मेळा यंदा उमरावतीस भरावयाचा असून त्यांच्या तारखा मार्च महिन्यांतील १९ व २० अशा नेमल्या आहेत. सभासदांनीं वर्गण्या पाठविण्याची जलदी करावी.

या तालुक्यांतील सांगवी व उगवें यांच्या दरम्यान एका लक्ष्मण गुरव नांवाच्या सराफाला रात्री वाटेंत चोरांनीं मेरे पर्यंत बेदम मारलें आणि तो मनुष्य अखेरीस कालमरण पावला. अशा प्रकाराचे दगे फटके दिवसेंदिवस वाढत जातील असा रंग दिसतो.

गोरक्षणी सभेची काल सभा भरली होती आणि गोभक्तांचे उपदेश झाल्यानंतर एक व्यवस्थापक कमिटी नेमण्यांत आली. गोरक्षण पुन्हा उर्जित दशेस येईल असा रंग दिसतो. फंड सरासरीं १०००।१२०० रुपये जमा आहे.

१३ व्या राष्ट्रीय सभेच्या स्थळाविषयीं व इतर व्यवस्थे विषयीं विचार करण्यासाठीं काल उमरावतीस एक मोठी सभा भरणार होती. अकोल्याहून बरेंच थोर गृहस्थ गेले आहेत.

---

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८९ रुपये |
| जवारी | ८५ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११२॥ रु० |
| ,, ( बनशी ) | १२५रु० |
| चणे | ९० रु० |
| तेल | ६ रु० मण |
| तूप | ६॥ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८५ |

---

## नोटीस

आकोला सेंट्रल जेलचे बगिच्या करितां एक हुशार व अनुभविक माळी पाहिजे. दरमहा पगार १२ रुपये मिळेल. सर्व ऋतूंत येणाऱ्या भाज्या व त्यांची लागवड वगैरेची पूर्ण माहिती त्याला असली पाहिजे. लायकीचे दाखल्यासह अर्ज करावा अगर प्रत्यक्ष येऊन भेटावें.

( Sd. ) E. W. Reilly.
सुपरिटेंडेंट सेंट्रल जेल.
आकोला.

---

## वर्तमानसार.

आळिवाचें तेल आंगास चोळावें, त्यानें ग्रंथि ज्वराची साथ मुळीं बाधत नाहीं असा अनुभव प्रसिद्ध झाला आहे.

झाडकील साहेबांचें भविष्यः—

सूर्य मकरराशीमध्यें प्रवेश करावयाच्या वेळीं, बुध प्रबळ असल्या कारणानें आणि तो चंद्रमाच्या सन्मुख व मंगळसहवर्तमान अक्षवृत्तामध्यें असल्याकारणानें चहूंकडे मोठे फंद फितूर उत्पन्न होतील. आणि परदेशीय राजांबरोबर युद्धप्रसंग चालण्याचें मोठें भय उत्पन्न होईल. कोणीएक बलाढ्य शत्रु इंग्लंड देशावर शह आणील आणि प्रतिस्पर्धींच्या कांहींएक युक्तिबलामुळें, इंग्लंड देशास लढाई करण्याचा भाग पडेल. पूर्व व पश्चिम ह्या दोन्ही दिशांमध्यें तसेंच दक्षिण आफ्रिकेंत इंग्लंडचा भाग येत्या हिवाळ्यांत भयानें घेरून जाईल. आणि लढाईचें निवारण करण्याकरितां राजद्वारीं मोठमोठ्या मुत्सद्दीपणाच्या युक्तिप्रयुक्ति योजाव्या लागतील.

शनैश्वर आणि युरेनस अकराव्या भुवनांत असल्याकारणानें, पार्लमेंटमध्यें बेबनाव सुरू होईल आणि त्यांतील पुष्कळ सभासद मांदे पडतील.

सेन्टपिटर्सवर्ग शहराविषयीं शनैश्वर ग्रह उत्तर दिशेस मध्य रेषेच्या अगदीं जवळ आहे, ह्मणून, रशियन लोक सुधारणा व स्वातंत्र्य मिळावें ह्मणून आपसांत मोठा दंगा सुरू करतील. आणि रशियनचा राजा आपल्या प्रजेस अवश्य असतील ते हक्क देइल असा संभव आहे. ग्रहकुंडलीवरून असें निष्पन्न होत आहे कीं, निहिलिस्ट लोकांच्या कावेबाजपणाबद्दल रशियाच्या राजानें सावधगिरि ठेविली पाहिजे. आणि स्वतःची शरीरप्रकृती संभाळली पाहिजे.

कलकत्यात शनैश्वर व युरेनस आठव्या भुवनाच्या अंत्य प्रदेशीं उभे राहिले आहेत. ह्मणून हिंदुस्थानांतील कित्येक प्रख्यात लोक एकाएकी मरण पावतील. ह्यातान्या मनुष्यांना मृत्यु येईल. पुष्कळजण बुडून आणि कित्येकजण अग्नीनें भाजून मरण पावतील.

सूर्य आणि बुध नवव्या भुवनांत असल्याकारणानें विद्येची वृद्धि होईल; परंतु बुध चंद्रमाच्या सन्मुख आल्यामुळें, धर्मसंबंधी हरकती सुरू होतील, आणि त्यासाठीं फंद फितूर चालू होतील, व मोठा दंगा सुरू होईल.

सूर्याचें कंकणाकृति ग्रहण ता० ९ फेब्रुवारी रोजीं होईल. परंतु युरोपांत दिसणार नाहीं. दक्षिण अमेरिकेंतील वेनेझवीला राज्याची राजधानी कोरेकस ह्या शहरांत चांद रात्रीचा चंद्र, संध्याकाळीं पावणेचार वाजतां दिसत आहे, आणि सूर्यग्रहण कुंभराशीमध्यें व आठव्या भुवनांत असल्या कारणानें, वेनेझवीलामध्यें एक भयंकर आणि नाशकारक धरणीकंप होईल. महगाई होईल. लूट दरोडे व रोगाची सात सुरूं होईल. ता. २० मार्च ह्या दिवशीं सूर्य मेष राशीच होईल, त्यावेळीं बरलीन, वियेना व अथेन्स ह्या शहरामध्यें मंगळ बळवान् होईल. व त्यामुळें जर्मनी, आस्त्रिया व हंगारी ह्या राज्यामध्यें शांतीचा भंग होईल- आणि शेवटीं ते आपल्या शत्रूवर जय मिळवतील. अनार्किस्ट लोक, महा पुरुषांवर हल्ला करितील. ग्रीस देश शांत बसून न राहतां तुर्कस्थानापासून तो कांहीं मुलुख मिळवील. कान्स्टांटिनोपल शहरांत मंगळ बळवान आहे ह्मणून, तुर्कस्थानांत कापाकापी, मारामारी व खून, जरूर सुरु होतील. तुर्कस्थानच्या पूर्वेकडील भागांत बहुतकरून धरणीकंप होईल हिंदुस्थानांत धर्म संबंधीं तंटे चालण्याचें भय आहे. ह्यावेळीं हिंदि लष्कर प्रतिष्ठा व कीर्ति मिळवील.

शुक्र मध्य रेषेंत बळवान् आहे. व गुरु द्वितीय भूवनामध्यें आहे. ह्मणून हिंदुस्थानच्या वसूलांत व व्यापारांत वृद्धि होईल. पॅकिनमध्यें गुरु, शनैश्वर सहवर्तमान चोथ्या भुवनांत प्रवेश करितो ह्मणून तेथें बंड व लढाई सुरु होतील; धरणीकंपही होईल.

टोक्योंकडे मंगळ इतर सर्व ग्रहापेक्षां उच्च अंशांत असल्या कारणानें, कर वाढतील लष्कराचा जोर वाढेल, आणि बहुतकरून लढाई सुरुं होईल. जपानचा राजा आपल्या प्राणरक्षणाच्या भयांत पडेल. आणि कदाचित त्यास कावेबाज पणानें मारून टाकण्यांत येईल.

तारीख २१ जून ह्या दिवशीं सूर्य कर्क राशीचा होईल आणि त्यावेळीं कलकत्याकडे गुरु उच्च अंशाचा असल्या कारणानें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत मोठा सुधारणा होईल. शुक्र नवभुवनांत आहे, ह्मणून देशी हुन्नर, उद्योग, शिक्षण, गायन, व साहित्य ह्या मध्यें वृद्धि होण्याची आशा आहे.

तारीख २२ सप्टेंबरच्या दिवशीं सूर्य तुला राशीचा होईल. त्यावेळीं इंग्लंडमधील लोकांची तन दुरस्ती चांगली चालणार नाहीं आणि तापाचा रोग पसरून जाईल. परकीय राज्यसंबंधीं चिंतेमुळें व संस्थानासंबंधीं सवालामुळें, इंग्रजी प्रजेची तनदुरस्ती अस्वस्थ राहील. इंग्लंडांत स्त्रिया आणि बालक ह्यांवर घातकीपणा गुजरेल. आणि स्त्रिया बाळंतपणांत मरून जातील.

कलकत्याकडे मंगळ चौथ्या भुवनांत असल्यामुळें ब्रह्मदेशांत मारहाण चालेल. रेल्वे व टपाल खात्यासंबंधी गैरसोई होतील. युनाइटेडस्टेट्समध्यें राजसंबंधी भवति न भवतियुक्त वादविवाद होतील. अमेरिकन लष्करांत बेदिली उत्पन्न होईल. व ह्या वर्षाची आठवण राहील असा एक मोठा शोध निघेल.

शनैश्वर आणि युरेनस ह्या ग्रहांचा योग होईल. त्यावेळेस असा चमत्कार होईल कीं. तसा चमत्कार इ. स. १३०७ व्या वर्षानंतर झालेला नाहीं. स. १३०७ मध्यें इंग्लंडचा राजा पहिला एडवर्ड. स्कॉटलंडचा राजा ब्रुस यावर चाल करून जाते वेळीं मरण पावला होता. त्यावरून लढाईचा विचार मांडून वाळण्याचे भाग पडले होते. त्यावरून, ह्या येत्या वर्षात ग्रहांचे पुष्कळ योग होणार आहेत या योगानें इतिहासांत ह्या येत्या वर्षाची आठवण राहील असें होईल. स. १८०५ मध्यें शनैश्वर आणि युरेनस ह्यांचा योग होण्यास मात्र २ अंशाचा फरक होता त्यावेळी त्राफलगारची लढाई झाली होती आणि त्यांत इंग्लंडनें समुद्रामध्यें आपला श्रेष्टपणा दाखवून दिला होता. त्यानंतर ह्या दोन्ही ग्रहांचे सामीप्य ता. १६ मार्च सन १८९२ ह्या दिवशीं झाले होतें. त्या सुमारास फ्रान्सचे प्रजासत्ताक राज्याचीं उथलपाथल झाली. लुईझ नेपोलियन सत्ताधिकारी झाला होता. ही गोष्ट घडल्यानंतर थोड्या वेळांत प्रसिद्ध क्रिमियाची लढाई झाली होती. येत्या वर्षी होणाऱ्या योगापासून चांगल्या नाशिबानें इंग्लंडला नुकसान होण्याचे भय नाहीं. आणि फार होईल तर मांदगी पसरेल.

कान्स्टांटिनोपलकडे, चंद्र बळवान् आहे, आणि मंगळ चौथ्या भुवनांत आहे ह्या गोष्टी तुर्कस्थानच्या बादशाहाविषयीं संकटकारक आहेत. स. वि.

हतीच्या कळपाची शिकार- म्हैसूर संस्थनांतील नौकर मि० शामीएंगर यांनीं हत्तीच्या कळपाची शिकार करून त्यांपैकीं ९० हत्ती पकडलें अशी मद्रासेहून खबर आली आहे.

सर्व टर्किश बंदरामध्यें कराचीहून येणाऱ्या लोकांस १० दिवस निराळे ठेवून त्यांची चीजवस्त अगदीं स्वच्छ करून टाकण्याचा कडक ठराव झाला आहे.

फिलिपैन्स बेटांकडून आलेल्या बातम्यावरून समजतेकीं ' बुलियन येथे एक मोठी लढाई होऊन बंडवाल्यांचा पराजय झाला आणि त्यांचे ११०० लोक ठार झाले, आणखी स्पॅनिश लोकांची ९० मनुष्यें मेली.

मुंबईतलें मारवाडी साथीला भिऊन पळून गेले ह्मणून स्मालकॉझ कोर्ट अगदीं ओस दिसत होतें जो मारवाडी ता० जानेवारी नंतर येथें राहील त्याला ५०० रुपये दंड करावा असा त्यांचा पंचाईतेमध्यें ठराव केल्याचें ही प्रसिद्ध झालें आहे.

लार्ड एल्जिन साहेबांची मुदत संपली ह्मणजे त्यांच्या अधिकारावर हिंदुस्थानचें हल्लींचे विलायतेतील अंडर सेक्रेटरी लार्ड ऑनस्लो यांची नेमणूक करण्याचे विलायत सरकारनें ठरविले आहे असें ह्मणतात. यांनीं आजपर्यंत ह्यांची बरीच कामें केलीं असून न्यूझीलंडचे गव्हरनर असतांना यांनीं बरीच लोकप्रीति संपादन केली आहे.

तुर्क देशांत दारू प्याले असतां सोट्याची शिक्षा देतात.

अमृतसरास पूल पडून सत्तर लोक तलावाचे पाण्यांत बुडाले.

कापसांतील सरकी काढण्याचे काम उदरां कडून अमेरिकेन लोक करून घेत आहेत.

हिंदु ब्यांक--कलकत्ता येथील कांहीं पुढारी मंडळीचा तेथें एक इंग्लिश तऱ्हेची हिंदु लोकांची ब्यांक स्थापन करण्याचा विचार चालला आहे. असें होईल तर फारच उत्तम आहे. आ. व

श्री० जमखंडीकर यांचा मृत्यु.--जमखंडी संस्थानचे मालक श्री० आपासाहेब पटवर्धन यांस ता० १२ जानेवारी रोजीं देवाज्ञा झाली थोडक्या दिवसांतच दोन चांगल्या संस्थानिकांचा देहांत झाला, ही फारच विस्मयाची गोष्ट !

मृत्यु-- मि० हरी गोपाळ पाध्यें नरसिंगपूरचे एकस्ट्रा असि० कमिशनर यांस देवाज्ञा झाली; हे चांगले ग्रंथकार असून कट्टे सुधारक होते.

कराची म्युनिसिपालिटीला साथीची घरें जाळून नाश करून टाकण्याचा अधिकार मिळाला आहे. स. शो.

बाह्य देशांहून हिंदुस्थानांत किती धान्य आणवितां येईल ह्या संबंधानें हिंदुस्थानच्या शेतकी खात्यामार्फत प्रसिद्ध झालेली माहिती खाली दिली आहे:--

| | | |
|---|---|---|
| तांदूळ | ११००००० | टन. |
| गहूं | ६५००००० | " |
| बार्ली. | २०००००० | " |
| मेंझ [ मका ] | ३०००००० | " |

मुंबई--चुनखड्यांच्या धुरानें कोणतीही रोग बीजें तावडतेच मरतात असा बंगलोर येथील मि० चार्लसवर्थ यांचा अनुभव आहे. या प्रमाणें त्यानीं ज्या ज्या भागांत रोगविशेष आहे त्या त्या भागांत चुनखड्यांच्या धुऱ्या घालण्याविषयीं येथील हेल्थ आफिसर साहेबांस सूचना केली आहे. हेल्थ आफिसर साहेब त्या धुऱ्या घालोत, किंवा न घालोत परंतु लोकांनीं त्यांचा अवश्य अनुभव घेऊन पहावा. त्यापासून अपकार तरी खास होणार नाहीं. शु. सू.

उंदरांस सुस्वर ऐकला ह्मणजे मोह उत्पन्न होतो असें ह्मणतात. इतकेंच नव्हे. तर एखादा मुलगा मंजुळशी शीळ घालीत असल्यास ते आपल्या बिळाच्या तोंडाशी येऊन ऐकत रहतात असें शोधक ह्मणतात गाय बैल वगैरेंस श्रम झाल्यानंतर शेतकरी लोक गाणें ह्मणून आळवितात. गर्दभाचार्यांची संगीतप्रियता किती आहे हे करमणुकीच्या वाचकांस एक दोन वेळ सांगितलेंच आहे. हत्ती व घोडे संगिताला लुब्ध होतात. किंबहुना रस्त्यानें चालतां चालतां घोड्यांना एकसारख्या तालाचें गायन किंवा वादन ऐकल्यास त्यांचें चालणेंही त्या तालावर चालते असा अनुभव आहे. बॅटील नांवाच्या तुरुंगांत असणारा एक कैदी अलगुज वाजवीत असे. त्याचा तो मंजुळ ध्वनि ऐकण्यासाठीं एक कोळी अगदीं हमेष त्याच जवळचे भिंतीवर येऊन उभा राही. सिंह व वाघ यांस गायनाची मुळींच अभिरुचि नाहीं. किंबहुना त्यांचे मनावर गायनाचा मुळींच कांहीं परिणाम होत नाहीं. तथापि लांग येथील प्राणिसंग्रहालयांत आलेल्या अनुभवावरून असें आढळून आलें आहे कीं, लव्हेंडराचा वास सिंह व वाघ यांजवर फार विलक्षण परिणाम करितो. त्या वासानें हे दोन्हीहि प्राणी इतके मोहून जातात कीं, केवळ कोकराप्रमाणें बनतात व तहानभूकही विसरून जातात. उदबत्त्या व त्यांजमध्यें असणारी जटामासी यांच्या योगानें मांजराची काय अवस्था होत याच पुष्कळ वाचकांस प्रत्यक्ष अनुभव असेलच. त्या जटामावशी करितां मांजर केवढी लाळ घोटूं लागते !

महाराणी व्हिक्टोरियासाहेब यांचेजवळ एक विलक्षण सुई आहे. या सुईनें त्यांनीं विणण्याचें काम कधीं केलें नाहीं. ही सुई रेडिच येथील एका कारखान्यात महाराणी साहेबांसाठीं मुद्दाम तयार केली होती. या सुईचे पृष्ठभागावर महाराणी साहेबांच्या चरित्रांतील कित्येक विशेष प्रसंगाचीं चित्रें खोदलेली आहेत. तीं इतकीं बारीक आहेत कीं, सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं ती ठेविल्या खेरीज तीं चित्रें दिसत नाहींत. व०

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.